रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १६५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, १ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



### सरत्या वर्षाला निरोप

**मुरूड : समुद्रकिनारी आलेल्या पर्यटकांनी सायंकाळी मंद प्रकाशात जल्लोष करीत सरत्या वर्षाला निरोप दिला. दरम्यान, २०२५मधील शेवटचा सूर्यास्त पाहण्यासाठी अनेकांनी गर्दी केली होती.** (छाया : सुधीर नाझरे)

## अंतरंग

माथेरानमध्ये पर्यटकांची अपेक्षेपेक्षा कमी गर्दी/२
नवी मुंबई विमानतळावरून २६ हजार जणांचा प्रवास/६
एमसीए वूमेन्स स्पर्धेत रायगडचा दुसरा विजय/८

# पनवेल महापालिकेत भाजपची विजयी सलामी

## नितीन पाटील यांची नगरसेवकपदी बिनविरोध निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने विजयी खाते उघडले आहे. भाजपचे प्रभाग १८ ब मधील उमेदवार नितीन जयराम पाटील हे बिनविरोध निवडून आले आहेत. विरुद्ध उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाल्यामुळे ते बिनविरोध झाले आहेत. त्यांच्याविजयी सलामीच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक १५ जानेवारी रोजी होणार आहे. त्यापूर्वी अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरू होती. ३० डिसेंबर २०२५ हा अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस होता. या वेळी प्रभाग १८ च्या ब जागेसाठी भाजपकडून नितीन जयराम पाटील आणि शेकाप आघाडीकडून रोहन अरविंद गावंड यांनी नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी अर्ज दाखल केले होते. या अर्जाची छाननी ३१ डिसेंबर २०२५ रोजी झाली. यामध्ये रोहन गावंड याना जात पडताळणीच्या कागदपत्रांची योग्य पूर्तता न झाल्याने शेकापचे रोहन गावंड यांच्या अर्जावर हरकत घेण्यात आली. त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांनी गावंड यांचा अर्ज बाद केला असल्याचे जाहीर केले.

याठिकाणी फक्त दोनच जणांनी अर्ज दाखल केल्याने भाजपचे नितीन जयराम पाटील यांचा उमेदवारी अर्ज वैध ठरल्याने ते बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले. **(पान २ वर..)**



**पनवेल महापालिकेच्या निवडणुकीतील हा विजय महायुतीच्या विजयाची नांदी आहे. नितीन पाटील यांनी पनवेलची सेवा केली आहे. हा विजय म्हणजे कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा आणि जनतेच्या विश्वासाचा विजय आहे. भाजपचे या निवडणुकीमध्ये खाते उघडले आहे. याच्या पुढचा विजय अतिशय देदीप्यमान असेल. नितीन पाटील यांचे खूप खूप अभिनंदन! पुढील काळात पनवेलच्या विकासासाठी अधिक ताकदीने काम करू.**

**–प्रशांत ठाकूर, आमदार**

# मुंबई महापालिका जिंकण्यासाठी भाजपचे उमेदवार जोमाने मैदानात

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीमध्ये या वेळी शिवसेना शिंदे गट आणि भाजपची युती आहे. भाजप १३७ जागा लढवणार आहे, तर शिवसेना शिंदे गट ९० जागा लढवणार आहे, भाजपकडून उमेदवारांची फायनल यादी जाहीर करण्यात आली आहे.

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. महापालिका निवडणुसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ३० डिसेंबर होती. बुधवारपासून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सुरुवात झाली आहे, दरम्यान मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना शिंदे गट आणि आरपीआय यांची युती आहे. या निवडणुकीत भाजप १३७ जागा लढवणार असून, शिवसेना शिंदे गट ९० जागा लढवणार आहे, तर आरपीआयला भाजपच्या कोट्यातून जागा मिळणार आहेत.



भाजपने आता आपल्या संपूर्ण १३७ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. तर दुसरीकडे या निवडणुसाठी शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाची आघाडी रिंगणात असणार आहे. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांची युती झाली असून, मुंबईमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट मात्र स्वबळावर निवडणूक लढणार आहे.

### उमेदवारांची यादी

तेजस्वी घोसाळकर, प्रकाश दरेकर, गणेश खणकर, योगिता पाटील, शिवानंद शेट्टी, जितेंद्र पटेल, राणी द्विवेदी, सिमा शिंदे, जिग्ना शहा, श्वेता कोपरगावकर, शिल्पा सांगोरे, दक्षता कवठणकर, दीपक तावडे, लिना देहरकर, हिमांशु पारेख, शिवकुमार झा, स्वाती जयस्वाल, निशा परूळेकर, प्रितम पंडागळे, निलम गुरव, नितीन चौहान, धवल वोरा, मनीषा यादव, उज्वला वैती, सॅमुअल डेनिस, योगेश वर्मा, सिद्धार्थ शर्मा, प्रतिभा शिंदे, संजय आव्हाड, विनोद मिश्रा, संगिता शर्मा, संजय कांबळे, योगिता कोळी, तेजिंदर सिंग तिवाना, सुमित्रा म्हात्रे, विक्रम राजपूत, प्रती सातम, विल्पव अवसरे, हर्ष पटेल, राजुल देसाई, श्रीकला पिल्ले, संदीप पटेल, योगिराद दाभाडकर, सायली कुलकर्णी, रूपेश सावरकर, सरीता राजपुरे, विठ्ठल बंदेरी, आरती पंड्या, दीपक कोतेकर, रोहन राठोड, सुधा सिंह, अनिश मकवानी, सुनिता मेहता, ममता यादव, उज्वला मोडक, **(पान २ वर..)**

# कल्याण–डोंबिवलीत तीन, तर धुळे येथे दोन ठिकाणी मतदानाआधीच फुलले ‘कमळ’

**ठाणे, धुळे : प्रतिनिधी**

कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेमध्ये तीन ठिकाणी भाजपाचे नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. आसावरी नवरे, रेखा चौधरी आणि रंजना पेणकर या बिनविरोध निवडून आल्या आहेत. तर धुळे महापालिका निवडणुकीत दोन महिला नगरसेवकपदी बिनविरोध निवडून आल्या आहेत.

कल्याण–डोंबिवलीमधील प्रभाग क्रमांक १८ अ मधील नागरिकांच्या मागास प्रवर्गामधून रेखा चौधरी यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. तर प्रभाग क्रमांक २६ क मधून भाजपाच्या आसावरी नवरे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. त्याशिवाय भाजपच्या रंजना पेणकर ह्या प्रभाग क्रमांक २६ ब मधून बिनविरोध निवडून आल्या आहेत. येथेही एकमेव अर्ज दाखल होता.

धुळे महापालिका निवडणुकीत प्रभाग १ अ मधून उमेदवार उज्ज्वला भोसले यांचा एकमेव अर्ज शिल्लक राहिल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. प्रभाग क्रमांक ६ ब मधून ज्योत्सना पाटील याही विजयी झाल्या आहेत.

### पीपल्स रिपब्लिकन पार्टीचा भाजप महायुतीला जाहीर पाठिंबा

**पनवेल :** पीपल्स रिपब्लिकन पार्टीने पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र पीआरपीचे रायगड जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे यांनी माजी खासदार लोकनेते तथा पनवेल मनपा निवडणूक प्रभारी रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले आहे. **(पान २ वर..)**



**पनवेल : आदिवासी संघटनेचे अध्यक्ष, पत्रकार गणपत वारगडा यांनी २०२६ सालची आदिवासी दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. त्याचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय कदम, बाळू जुमलेदार, मयूर तांबडे, सुनील पाटील, सुनील वारगडा, उषा वारगडा, रवी गायकवाड, अनिल कुरघोडे, सनिप कलोते, दीपाली पारस्कर आदी उपस्थित होते.**

## निवडक

### राऊतांच्या घराबाहेरील गाडीवर बॉम्बच्या धमकीचा मेसेज

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षाचे खासदार आणि प्रमुख नेते संजय राऊत यांच्या घराबाहेर पार्क केलेल्या गाडीवर कोणीतरी धमकीचा संदेश लिहिला होता. पोलिसांनी लगेच घटनास्थळी पोहचून तपास सुरू केला. बॉम्बशोध पथक आणि डॉग स्क्वॉडला पाचारण करण्यात आले. गाडीवरील संदेश पाहून घरात किंवा आसपास बॉम्ब असण्याची शक्यता तपासण्यात येत आहे.

### अतिवेगवान वंदे भारत रेल्वेची चाचणी यशस्वी

**राजस्थान :** स्वदेशी बनावटीच्या वंदे भारत स्लीपर ट्रेनची हायस्पीड चाचणी पूर्ण झाली असून ही ट्रेन सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कोटा–नागदा विभागात ही चाचणी घेण्यात आली असून यावेळी ट्रेन १८० किलोमीटर प्रति तास वेगानं धावली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या चाचणीची चित्रफित समाजमाध्यमावर पोस्ट केली.


# मोदी सरकारकडून महाराष्ट्राला गिफ्ट!

## दोन प्रमुख महामार्ग प्रकल्पांना केंद्राची मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहारांवरील कॅबिनेट समितीने बुधवारी (दि.३१) देशातील पायाभूत सुविधांना गती देणाऱ्या दोन प्रमुख महामार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांची एकूण अंदाजित किंमत २०,६६८ कोटी आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नाशिक–सोलापूर–अक्कलकोट (३७४ किमी) कॉरिडोर आणि ओडिशातील NH–३२६ (२०६ किमी) रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाचा समावेश आहे.

कॅबिनेटने महाराष्ट्रात BOT (टोल) मोडवर ३७४ किमी लांबीच्या नाशिक–सोलापूर–अक्कलकोट कॉरिडोरच्या बांधकामाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत १९,१४२ कोटी आहे. हा कॉरिडोर नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर या महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडत कुरनूलपर्यंत कनेक्टिव्हिटी मजबूत करेल. हा उपक्रम पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत एकात्मिक वाहतूक पायाभूत सुविधा विकासाला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा आहे.



प्रस्तावित ग्रीनफिल्ड कॉरिडोरला दिल्ली–मुंबई एक्सप्रेसवे (वधावन पोर्ट इंटरचेंजजवळ), आग्रा–मुंबई कॉरिडोर (NH–६०, अडेगाव जंक्शन) आणि समृद्धी महामार्ग (पांगरी, नाशिकजवळ) यांच्याशी जोडण्याचा प्रस्ताव आहे. हा ६–लेन, एक्सेस–कंट्रोल्ड कॉरिडोर पश्चिम किनाऱ्यापासून पूर्व किनाऱ्यापर्यंत थेट कनेक्टिव्हिटी देईल. या प्रकल्पामुळे प्रवास वेळेत १७ तासांची बचत होणार असून, २०१ किमी अंतरही कमी होणार आहे.

# चोंढी येथे दुचाकीचा अपघात; एकाचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबा–रेवस मार्गावर चोंढी पुलाजवळ मंगळवारी (दि. ३०) रात्री दुचाकीला झालेल्या भीषण अपघात एका तरुणाचा मृत्यू झाला. एक जण जखमी झाला. हर्षित संजोग पालवणकर (रा. अलिबाग) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. शुभम गुप्ता हा गंभीर जखमी झाला आहे. जखमी शुभम गुप्ता याच्यावर नवी मुंबईतील एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

हर्षित पालवणकर व शुभम गुप्ता हे दोघे दुचाकीवरून अलिबागच्या दिशेने परत येत होते. चोंढी पुलाजवळील तीव्र वळणावर दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या बॅनरच्या लोखंडी खांबास जोरात धडकली. धडकेनंतर दुचाकी काही अंतर पुढे घसरत गेली. त्यात ही दोन्ही तरुण गंभीर जखमी झाले.

मांडवा पोलिसांनी येथील नागरिकांच्या मदतीने जखमी तरुणांना तत्काळ उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल, अलिबाग येथे दाखल केले. उपचारादरम्यान हर्षित संजोग पालवणकर याचा मृत्यू झाला. गंभीर जखमी शुभम गुप्ता यास पुढील उपचारासाठी नवी मुंबईतील एमजीएम हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

# थर्टीफर्स्टचा जल्लोष पहाटेपर्यंत सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि आर्केस्ट्रा बार पहाटे ५ वाजेपर्यंत उघडे ठेवण्यास अधिकृत परवानगी देण्यात आली आहे.

राज्य सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, ही सवलत केवळ बंदिस्त किंवा इनडोअर आस्थापनांसाठीच लागू असेल. खुल्या जागा, टेरेस किंवा मोकळ्या मैदानावरील सेलिब्रेशनला ही वेळ मर्यादा लागू असणार नाही. त्यामुळे बंदिस्त हॉल किंवा हॉटेल्समध्ये नागरिकांना पहाटेपर्यंत जल्लोष करता येणार आहे.

**नागरिकांनी उत्साहात आणि आनंदाने नवीन वर्षाचे स्वागत करावे, मात्र कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी. नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.**

**–मिलिंद भारंबे,**
पोलीस आयुक्त, नवी मुंबई

या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. नाक्या–नाक्यावर तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून विशेषतः ’ड्रंक अँड ड्राईव्ह’ आणि अमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांची विशेष करडी नजर असणार आहे.

# रायगडात नववर्षाचे जल्लोषात स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सरत्या वर्षाला निरोप देऊन निवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी बुधवारी (दि. ३१) रात्री रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी गर्दी केली होती. रात्री ठिकठिकाणी पर्यटकांच्या पार्ट्या सुरू होत्या. अनेक हॉटेल्समध्ये डिजेची व्यवस्था करण्यात आली होती. फटाक्यांची आतषबाजी करीत आणि एकमेकांना शुभेच्छा देत सर्वांनी नवीन वर्षाचे स्वागत केले.

मुंबईपासून जवळ असल्यामुळे नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी हजारो पर्यटक रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्याना पसंती देतात. नववर्षाचे स्वगत करण्याकरीता रायगड जिल्ह्यात पर्यटनाला येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यंदादेखील अलिबागसह नागाव, किहीम, काशिद, मुरूड, दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धनच्या किनार्यांवर दाखल झाले होते. २०२५ च्या शेवटच्या मावळत्या सुर्याला निरोप देण्यासाठी सायंकाळी पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर गर्दी केली होती. रात्री ठिकठिकाणी पर्यटकांच्या पार्ट्या सुरू होत्या. अनेक हॉटेल्समध्ये डिजेची व्यवस्था करण्यात आली होती. डिजेच्या तालावर थिरकत पर्यटकांनी थर्टीफर्स्टचा आनंद लुटला. रात्री पार्टी आटोपल्यानंतर सर्वजण किनाऱ्यावर दाखल झाले. फटाक्यांची आतषबाजी करीत आणि एकमेकांना शुभेच्छा देत सर्वांनी नवीन वर्षाचे स्वागत केले.

अलिबागच्या किनाऱ्यांवर यंदा एलईडी लाईट असलेले फुगे, मुलांसाठी एलईडी दिवे टियारा, एलईडी लाईट असलेले गॉगल्स यांचे आकर्षण पर्यटकांमध्ये पहायला मिळाले. काहींनी पेटलेले पॅराशूट आकाशात सोडून सरत्या वर्षाला निरोप देत नववर्षाचे स्वागत केले. किनारपट्टी बरोबरच कर्जत खालापूर तालुक्यातील अनेक फार्महाऊसेस हाऊसफुल्ल झाली होती.

(छाया : जितू शिगवण)



# राज्यात एसटी बसस्थानक स्वच्छतेसाठी विशेष मोहीम

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. साचलेला कचरा, अनावश्यक झाडे–झुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी–जळमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे. कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण व विल्हेवाट लावली जाणार असून प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रत्येक बसस्थानकावर या मोहिमेची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे.

दर १५ दिवसांनी होणाऱ्या या स्वच्छता मोहिमेमुळे एसटी बसस्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार असून प्रवासी सेवेमध्ये गुणवत्तावाढ होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# गोव्यात ‘कुशावती’ तिसरा नवा जिल्हा

**पणजी :** १६ लाख लोकसंख्येच्या गोव्यामध्ये आतापर्यंत उत्तर गोवा आणि दक्षिण असे दोन जिल्हे होते, आजपासून कुशावती या नावाने तिसरा जिल्हा स्थापन झालेला आहे. बुधवारी (दि.३१) मंत्रालयामध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी ही माहिती दिली. दक्षिण गोव्यातील धारबांदोडा, सांगे, केपे आणि काणकोण या चार ग्रामीण तालुक्यांचा मिळून हा कुशावती जिल्हा तयार करण्यात आलेला आहे .

या चारही तालुक्यातून वाहणारी कुशावती ही नदी असून गोव्यावर चालुक्यांच्या राजवटीमध्ये ती प्रसिद्ध नदी होती तेथे मोठ्या प्रमाणात जल वाहतूक होत होती. चारही तालुके याच नदीच्या तीरावर आहेत त्यामुळे कुशावती हे नाव देण्यात आल्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी सांगितले.

येत्या काळामध्ये तिसराजिल्हा स्थापण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे, त्यासाठी केंद्राकडून निधी उपलब्ध होणार आहे. लवकरच गोवा सरकार केंद्राला त्या बाबत पत्र लिहिणार असल्याचे सांगून सध्या दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयात बसूनच नवे जिल्हाधिकारी तिसऱ्या कुशावती जिल्ह्याचा कारभार हाताळणार असल्याचे मुख्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले.

# रायगडात १ ते ३१ जानेवारीमध्ये व्हॅनद्वारे कॅन्सर तपासणी मोहीम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कॅन्सरचा लवकर शोध लागून वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने जिल्ह्यात दि.०१ जानेवारी ते दि.३१ जानेवारी २०२६ या कालावधीत कॅन्सर व्हॅनद्वारे तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील नागरिकांनी या मोफत कॅन्सर तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी केले आहे.

उपसंचालक,आरोग्य सेवा ठाणे यांच्या स्तरावरून जिल्ह्यासाठी कॅन्सर व्हॅन उपलब्ध करून देण्यात येणार असून ए. टी.पी.नुसार थळ,वाघोली, कोर्लई , तळा, दिघी, नेरूळ, पाभरे, कापडे, टोल,वरंध, निजामपूर, साई, धाटाव,रोहा, जांभूळपाडा,आरव, आमटेम, अंजप, कर्जत,वडवळ, होनाड, आजीवली, जासई, पोयंजे या गावामध्ये खालील वैद्यकीय अधिकारी यांच्या माध्यमातून ही मोहीम राबविली जाणार आहे.


या कॅन्सर व्हॅनसोबत एक स्त्रीरोगतज्ज्ञ, एक दंत शल्यचिकित्सक तसेच एक सहाय्यक परिचारिका उपस्थित राहणार असून प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून गावागावातील नागरिकांची कॅन्सर तपासणी करण्यात येणार आहे. एका दिवसात किमान १५० नागरिकांची कॅन्सर तपासणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

कॅन्सरसारख्या गंभीर आजाराबाबत जनजागृती होऊन नागरिकांनी वेळेत तपासणी करून घ्यावी तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचावी हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

या मोहिमेसाठी हर्षा राऊत, सहाय्यक परिचारीका भाल,प्रणाली माळी, सहाय्यक परिचारीका वाघोली, शिल्पा ठाकुर, सहाय्यक परिचारीका कोर्लई, सिमा बारकुल, सहाय्यक परिचारीका तळा, ज्योती महाडिक, सहाय्यक परिचारीका नेवरुळ, गितांजली पाटील, सहाय्यक परिचारीका पाभरे, लतिका भांगोजी, सहाय्यक परिचारीका दिघी, मनीषा मोरे, सहाय्यक परिचारीका कापडे, अंजली जांधव, सहाय्यक परिचारीका टोल, सुगंधा ढवळे, सहाय्यक परिचारीका वरंध, जयश्री वाघमारे, सहाय्यक परिचारीका निझामपूर ,सविता पेढवी, सहाय्यक परिचारीका साई, अर्पणा मखर, सहाय्यक परिचारीका धाटाव, स्नेहल चांदोरकर, अधीपरिचारीका रोहा, दर्शना पाटील, सहाय्यक परिचारीका जांभूळपाडा, काशी वाघ, सहाय्यक परिचारीका आराव, हर्षदा पाटील, सहाय्यक परिचारीका आमटेम,भावना महाले, सहाय्यक परिचारीका अंजप, ज्योती ओव्हाळ, अधीपरिचारीका कर्जत, सुर्वणा मोरे, सहाय्यक परिचारीका होणंद, अर्चना चव्हाण, सहाय्यक परिचारीका वडखळ, संजना सोनाबने, सहाय्यक परिचारीका अजिवली,अमृता ढाकणे, सहाय्यक परिचारीका पोयंजी सुप्रिया वाडकर, जासई मोनाली पाटील,आदींची सेवा उपलब्ध राहणार आहे.

# माथेरानला पर्यटकांची अपेक्षेपेक्षा कमी गर्दी

**नेरळ : प्रतिनिधी**



नाताळच्या पार्श्वभूमीवर सलग लागून आलेल्या सुट्ट्यांमुळे माथेरानमध्ये गेल्या काही दिवसांत पर्यटनाला काही प्रमाणात चालना मिळाली. वाढत्या पर्यटकांमुळे स्थानिक हॉटेल व्यावसायिक व छोटे व्यापारी यांच्यात समाधानाचे वातावरण होते. थंडीच्या लाटेचा प्रभाव जाणवत असून दिवसभर गारवा आणि रात्री हुडहुडी अनुभवायला मिळत आहे, ज्यामुळे अनेक पर्यटकांना माथेरानचे हवामान आकर्षक वाटत आहे.

दिवाळी पर्यटन हंगामानंतर माथेरानमध्ये मोठी मंदी जाणवत होती. हॉटेल व्यवसाय आणि स्थानिक व्यवसायिक अडचणीत आले होते. मात्र नाताळ सुट्टीदरम्यान पर्यटकांची संख्या वाढू लागल्याने आगाऊ बुकिंग सुरू झाली होती. याच काळात घाटात वाहतूक कोंडी, मिनी ट्रेन व ई-रिक्षांच्या अपुऱ्या संख्येमुळे रांगा लागल्याचे चित्र दिसून आले असून, या सुविधा वाढवण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मात्र ३१ डिसेंबर रोजी, जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असूनही माथेरानमध्ये अपेक्षित गर्दी दिसून आली नाही. दरवर्षी सुमारे १५ हजार पर्यटक येतात, मात्र यंदा केवळ अडीच ते तीन हजार पर्यटक आल्याचे सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे यांनी सांगितले. बहुतांश पर्यटक हे एकदिवसीय असल्याने ते मौजमजा करून परतले, तर अनेक हॉटेल्स व लॉजमध्ये कमी दरात बुकिंग करण्यात येत होते.माथेरान शहरातील रस्त्यावरही तुरळक गर्दी दिसत होती.

कर्जत तालुक्यातील रिसॉर्ट्समध्ये गर्दी असणे, वर्षाचा शेवटचा दिवस आणि एकादशी एकत्र येणे, ही ३१ डिसेंबरला पर्यटक कमी असण्यामागची कारणे सांगितली जात आहेत.

# रायगड जिल्ह्यात प्रलंबित मोजणी प्रकरणांचा एकाच दिवशी होणार निपटारा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जून ते ऑक्टोबर या महिन्यांत सतत पाऊस असल्या कारणाने मोजणी काम होऊ शकलेले नाही. त्यामुळे उप अधीक्षक भूमि अभिलेख रोहा कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणात मोजणी प्रकरणे प्रलंबित राहिलेली आहेत. या मोजणी प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. ३ जानेवारी रोजी एकाच दिवशी १२६ प्रकरणांची मोजणी करण्यात येणार आहे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे सुहास दिवसे यांच्या निर्देशानुसार व उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई अनिल माने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड यांच्याकडून या प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्याकामी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या सर्व प्रकरणांत मोजणीच्या नोटीस सर्व संबंधितांना पाठविण्यात आल्या असून संबंधित अर्जदार व हितसंबंधित यांनी या दिवशी उपस्थित राहून आपल्या जमिनींची मोजणी करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड सुनिल इंदलकर यांनी केले आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख रोहा कार्यालयाकडे नोव्हेंबर २०२५ अखेर एकूण ३८९ मोजणी प्रकरणे शिल्लक होती. त्यातील २२६ मोजणी प्रकरणे मुदतबाह्य झालेली असून तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीवर प्रलंबित आहेत. पैकी ३६ प्रकरणांत मोजणी पूर्ण झालेली असून ६४ प्रकरणांत डिसेंबर मध्ये मोजणी तारखा लावण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत १२६ मुदतबाह्य मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत.

या विशेष मोहिमेमुळे तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर प्रकरणांचा निपटारा होणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. प्रलंबित मोजणी प्रकरणे एकाच दिवशी मोजणी होऊन, निकाली होऊन त्याचा वेगाने निपटारा होइल

# मुंबई मराठी पत्रकार संघाचे विविध पुरस्कार जाहीर

**मुंबई :** ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक दिलीप ठाकूर यांच्यासह ज्येष्ठ संपादक तुळशीदास भोईटे, अशोक अडसूळ, सचिन लुंगसे, विवेक दिवाकर, अविनाश कोल्हे आणि राजेश माळकर यांची यंदाच्या मुंबई मराठी पत्रकार संघाच्या विविध पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षी पत्रकार दिनी ६ जानेवारीला या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. रोख रुपये दहा हजार, गौरवचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.
यंदा ज्येष्ठ पत्रकार लेखक पी. साईनाथ यांच्या हस्ते सायंकाळी सहा वाजता पत्रकार संघाच्या सभागृहात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहीती संघाचे अध्यक्ष श्री. संदीप चव्हाण यांनी दिली.
यंदा पहिल्यांदाच सिनेपत्रकार आणि व्हिडीओ जर्नालिस्टसाठी संघातर्फे पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. ज्येष्ठ सिनेपत्रकारासाठी शिरीष कणेकर यांच्या पत्नी भारती कणेकर यांनी दिलेल्या देणगीतून पुरस्कार देण्यात आला असून या पहिल्या शिरीष कणेकर स्मृती पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ सिनेपत्रकार दिलीप ठाकूर ठरले आहेत. तसेच व्हिडिओ जर्नालिस्ट (कॅमेरामन) कै. वैभव कनगुटकर यांच्या स्मृती जपण्यासाठी उद्योगपती राजू रावल यांच्या देणगीतून वैभव कनगुटकर स्मृती पुरस्कार देण्यात येणार आहे. या पहिल्या पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ व्हिडीओ जर्नालिस्ट राजेश माळकर ठरले आहेत. जयहिंद प्रकाशनातर्फे वर्षातील सर्वोत्तम पुस्तकासाठी देण्यात येणार्‍या पुरस्कारासाठी ज्येष्ठ संपादक तुळशीदास भोईटे यांच्या '२०२४, भाजपा जिंकली! कशी?' या पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. उत्कृष्ठ राजकीय बातम्यांसाठी देण्यात येणारा रमेश भोगटे स्मृती पुरस्कार लोकसत्ताचे अशोक अडसूळ यांना, तर आप्पा पेंडसे पत्रकारिता पुरस्कार लोकमतच्या सचिन लुंगसे यांना जाहीर झाला आहे. कॉ. तु.कृ. सरमळकर पुरस्कार नवराष्ट्रच्या विवेक दिवाकर यांना, तर ललित लेखनासाठीचा विद्याधर गोखले पुरस्कार अविनाश कोल्हे यांना जाहिर झाला आहे. या पुरस्कारांसाठी ज्येष्ठ पत्रकार योगेश बिडवई, अजय कौतिकवार, अभिजित मुळये आणि समीर चवरकर यांच्या निवड समितीने काम पाहिले. येत्या ६ जानेवारी २०२६ रोजी होणार्‍या पत्रकार दिन सोहळ्यात मुंबई मराठी पत्रकार संघाच्या २०२६ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशनही होणार आहे. यावेळी या दिनदर्शिकेसाठी निवड झालेल्या छायाचित्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून लोकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संघाचे कार्यवाह श्री. शैलेंद्र शिर्के यांनी केले आहे.

पुरस्कार पुढीलप्रमाणे आहेत :
१. आप्पा पेंडसे पत्रकारिता पुरस्कार : . सचिन अंकुश लुंगसे, लोकमत
२. जयहिंद प्रकाशन पुरस्कार : तुळशीदास भोईटे, ज्येष्ठ पत्रकार
३. कॉ. तु. कृ. सरमळकर पुरस्कार : विवेक शंकर दिवाकर, नवराष्ट्र
४. विद्याधर गोखले - अविनाश कोल्हे, मुक्त पत्रकार
५. रमेश भोगटे पुरस्कार :अशोक नागनाथ अडसूळ, लोकसत्ता
६. शिरीष कणेकर स्मृती पुरस्कार : दिलीप अनंत ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार
७ राजेश माळकर, ज्येष्ठ व्हिडीओ जर्नालिस्ट

# शिवकालीन शस्त्रप्रदर्शनातून विद्यार्थ्यांना मिळाली स्फूर्ती



**अलिबाग : प्रतिनिधी**

आजची पिढी मोबाईल, व्हिडीओ गेम्स आणि स्क्रीनमध्ये अडकलेली असताना, भारतीय खेळसंस्कृती आणि शिवकालीन पराक्रमाचा थेट अनुभव देणारे एक वेगळेच चित्र कुरुळमध्ये पाहायला मिळाले. सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालय, कुरुळ येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनाने इतिहास हा फक्त अभ्यासक्रम नसून जगण्याची ऊर्जा आहे हे ठसठशीतपणे मांडले.

आपला कट्टा, नवी मुंबई संस्थेच्या पुढाकारातून साकारलेल्या या उपक्रमात मांडलेले पुरातन भारतीय बैठे खेळ हे केवळ करमणुकीचे साधन नाहीत, तर युद्धतंत्राचे प्रशिक्षण, सांघिक निर्णयक्षमता, शारीरिक व मानसिक शिस्त, स्वसंरक्षणाची जाणीव यांचा मूळ पाया आहेत, हे प्रत्यक्ष अनुभवातून समोर आले. हेच खेळ कधी काळी गडकिल्ल्यांवर, लेण्यांत आणि रणांगणात योद्धे घडवत होते आणि आज तेच खेळ नव्या पिढीला पुन्हा मुळांकडे नेण्याचे काम करत आहेत.

शिवकालीन शौर्याचा थरार

प्रदर्शनात ठेवलेली शिवकालीन दुर्मिळ शस्त्रे, ऐतिहासिक नाणी आणि महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची छायाचित्रे पाहताना अनेक विद्यार्थी थक्क झाले. इतिहासाच्या पुस्तकातील पाने येथे लोखंड, दगड आणि छायाचित्रांच्या रूपात जिवंत झाल्याचे चित्र दिसून आले.

या उपक्रमातून इतिहास बघायचा नाही, तो जगायचा असतो हा संदेश ठळकपणे पुढे आला. या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांबरोबरच पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देत उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील यांनी सांगितले की, आपली परंपरा, खेळसंस्कृती आणि शिवकालीन शौर्य नव्या पिढीपर्यंत पोहोचले, तरच सक्षम आणि राष्ट्राभिमानी समाज घडेल.

# एकात्मिक शेती पद्धती अंगिकारून क्रयशक्ती वाढवा -डॉ. रवींद्र मर्दाने

**कर्जत : रामप्रहर वृत्त**



वातावरणातील बदल, कृषी निविष्ठांचे वाढते दर,मजुरांची कमतरता, मजुरीवर होणारा खर्च इ.कारणांमुळे मेटाकुटीला आलेल्या शेतकऱ्यांनी एकात्मिक शेती पद्धती अंगिकारून क्रयशक्ती वाढवावी, असे प्रतिपादन कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले.कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा नाशिक व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने नाविन्यपूर्ण योजनेतून नाशिक जिल्ह्याच्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंबोली व पेठ तालुक्यातील कडवईपाडा येथील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या ६० शेतकऱ्यांनी अभ्यास दौऱ्यानिमित्त येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रास भेट दिली. त्यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी डॉ. मर्दाने यांनी विद्यापीठाने संशोधन केलेल्या विविध भात जाती, लागवड पद्धती,उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान, उत्पादन वाढीचे सूत्र आणि त्यामुळे वाढणारे उत्पादन मूल्य याबद्दल सखोल माहिती दिली.तसेच नाचणी पिकाचे महत्त्व, लागवड ते मूल्यवर्धन पर्यंतचे तंत्रज्ञान , आंब्याच्या जाती, शेतीपूरक सुधारित उपकरणे आणि एकात्मिक शेती पद्धती याबद्दल मार्गदर्शन केले.ते म्हणाले की, जल ,जमीन, जंगलवर अधिकार असणारा आदिवासी शेतकरी नागवल्या जात आहे.त्यामुळे त्यांनी सजग राहून नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे.

शासकीय योजनांचा लाभ घ्यावा. संघटना बळकट करावी.मुलामुलींना उच्च शिक्षण घेण्यास उद्युक्त करून मोक्याच्या जागा पटकवण्याचा ध्यास घ्यावा. 'आत्मा ' तर्फे राज्यांतर्गत तसेच राज्याबाहेरील नामांकित कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन नवतंत्रज्ञान समजून घेऊन त्याची अंमलबजावणी केल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो.

## पान १ वरुन





### पनवेल महापालिकेत भाजपची विजयी सलामी

पाटील यांचा उमेदवारी अर्ज वैध ठरल्याने ते बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले. भाजपकडून बिनविरोध होऊन विजयी सलामी दिल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. नितीन पाटील याना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते नंदू पटवर्धन, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह भाजप कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी यांनी शुभेच्छा दिल्या

### मुंबई महापालिका जिंकण्यासाठी भाजपचे उमेदवार जोमाने मैदानात

उमेश राणे, प्रकाश मुसळे, दिशा यादव, केशरबेन पटेल, जगदिश्वरी अमिन, अंजली सामंत, मिलिंद शिंदे, कृष्णा पारकर, प्रज्ञा सामंत, ज्योती उपाध्याय, सुहास आडिवरेकर, हेतल गाला, अलका केरकर, जितेंद्र राऊत, स्वप्ना म्हात्रे, अनुश्री घोडके, निलेश हंडगर, हेतल मोरवेकर, प्रकाश गंगाधरे, अनिता वैती, प्रभाकर शिंदे, नील सोमैय्या, दिपिका घाग, जेनी शर्मा, सारीका पवार, साक्षी दळवी, स्मिता परब, जागृती पाटील, चंजन शर्मा अनिल निर्मळे, अर्चना भालेरावस अलका भगत, अश्विनी मते, धर्मेश गिरी, राखी जाधव, रितु तावडे, नवनात बन, श्रृतिका मोरे, दिनेश पांचाळ, सुषम सावंत, वनिता कोकरे, काशिश फुलवारिया, आशा मराठे, महादेव शिवगण, वर्षा शेट्ये, आशा तायडे, आकाक्षां शेट्ये प्रकाश मोरे.

### पीपल्स रिपब्लिकन पार्टीचा भाजप महायुतीला जाहीर पाठिंबा

पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार प्रो. जोगेंद्र कवाडे यांच्या आदेशाने पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ करीता भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँगेस, आरपीआय (आठवले गट) महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिला आहे. या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी पक्षाचे कार्यकर्ते सक्रियपणे काम करतील, असा विश्वास पीआरपीचे रायगड जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे यांनी दिला आहे.

# जिल्हा परिषद बोरघरहवेली शाळेस स्मार्ट टीव्ही, प्रिंटर व दोन संगणक भेट

**तळा : प्रतिनिधी**



तळा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेस ३० जानेवारी २०२५ रोजी मुकुल जैन व योगेश खन्ना यांचे माध्यमातून दोन संगणक, स्मार्ट टीव्ही व प्रिंटर शाळेच्या मुख्याध्यापकडे सुपुर्द करण्यात आले.

सदर प्रसंगी मुकुल जैन व योगेश खन्ना,तसेच प्रमुख अतिथी माजी केंद्रप्रमुख तथा विस्ताराधिकारी दिपक ठाकूर,गावचे पदाधिकारी विलास कदम,दामोदर चव्हाण,लक्ष्मण शेलार,रामचंद्र सणस,सुरेश शेलार,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ.रसाळ,श्वेता चव्हाण, मुख्याध्यापक नथुराम मुंढे,साक्षी बारटक्के, प्रकाश ढाकणे,सपना बेंबलगे ज्यांनी हे शाळेला साहित्य मिळण्यासाठी प्रयत्न केले असे संतोष सकपाल व अरविंद कदम,आदिंसह ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.


यावेळी प्रथम दिपक ठाकूर व विलास कदम यांनी आपल्या मनोगतातून म्हटले की आजच्या या आधुनिक युगात डीजीटल व ऑनलाइन शिक्षणाला महत्त्व आले आहे. या बदलत्या काळानुसार शाळेसाठी श्री.जैन व श्री.खन्ना यांनी दिलेले संगणक व स्मार्ट टीव्हीचा लाभ होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळून शैक्षणिक प्रगती होण्यास साह्यभूत ठरणार आहेत.या दानशूर व्यक्तीनचे आभार मानले.

याचवेळी दानशूर व्यक्तीनी आपल्या मनोगतात म्हटले की विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आम्हाला हे साहित्य देण्याची एक चांगली संधी मिळाली.

या साहित्याचा चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांनी वापरुन आपली प्रगती साधावी असे म्हणत आपल्याला कोणती गरज भासल्यास निश्चितपणाने शैक्षणिक प्रगती करण्यासाठी मदत करू असे म्हटले .

## दुखवटा

### निळकंठ म्हात्रे



**उरण :** खोपटे (म्हात्रे पाडा) येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक निळकंठ धर्माची म्हात्रे (वय ८२) यांचे रविवारी (दि.२८) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर खोपटे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन पुत्र, एक कन्या, सुना, जावई, नातवंडे व पंतवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार (दि.६) खोपटे येथील नाना नानी पार्क येथे होईल. तर उत्तरकार्य गुरुवार (दि.८) खोपटे (म्हात्रेपाडा) येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.

## निवडक

### मारहाण करून मंगळसूत्राची चोरी

**पनवेल :** अज्ञात त्रिकुटाने एका विवाहित महिलेस धक्काबुक्की करून तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरी करून मोटार सायकलीवरून पसार झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील डेरवली बस स्टॉप जवळील रस्त्याच्या कडेला घडली आहे. स्वाती पाटील या बहिणीची वाट पाहत बस स्टॉप जवळ थांबल्या असताना दोन अज्ञात व्यक्ती काळ्या मोटरसायकलीवरून येऊन तीला धक्का बुक्की करून जखमी व तिच्या गळ्यातील १ लाख २० हजार रुपये किमतीचे मणी, सोन्याचे मंगळसूत्र खेचून ते पसार झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### महागड्या मोबाईलची चोरी

**पनवेल :** महागड्या मोबाईलची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केल्याची घटना पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेर एमएमएमटी बस स्टॉपच्या आवारात घडली आहे. मोहित कुमार सूर्यवंशी यांचा ५० हजार रुपये किमतीचा आय फोन १४ हा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सोसायटीसमोरील कचरापेटीची चोरी

**पनवेल :** खारघर सेक्टर ३४ मधील स्कायलाइन सोसायटीसमोर ठेवण्यात आलेली भलीमोठी कचरापेटी एका चोरट्याने दिवसाढवळ्या घेऊन जात असल्याचे सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्यामुळे नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत. खारघरमध्ये काही दिवसांपूर्वी चोरट्यांनी अनेक सोसायटींमधील लहान मुलांच्या सायकल, तसेच दारासमोरून चप्पल चोरी केल्याचे प्रकार सीसीटीव्हीद्वारे उघडकीस आले होते. चोरांनी आता सोसायटीचे डस्टबिन चोरी करून घेऊन जात असल्याचे चार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बंद असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करत आहेत.

### रिपब्लिकन फेडरेशनची आज बैठक

**नवी मुंबई :** नवी मुंबई मनपा सार्वत्रिक निवडणुकीत विविध प्रभागासाठी सक्षम आंबेडकरी उमेदवार निश्चित करणे, १११ वार्ड मधे एकच समान आंबेडकरी उमेदवार देणे तसेच निवडणूक २०२६ साठी संयुक्त राजकीय रणनीती ठरविणे, या विषयावर एका बैठकीचे आयोजन रिपब्लिकन फेडरेशन, नवी मुंबईच्या वतीने १ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता अप्रान्त १/२३ आर्टिस्ट व्हिलेज सेक्टर ८ सिबिडी बेलापूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली असल्याचे प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी कळविले आहे. या बैठकीत आंबेकरी चळवळीतील विविध ५६ फेडरेशनचे प्रमुख पदाधिकारी, इच्छुक उमेदवार उपस्थित राहणार आहेत.

# चिरनेर गावात दारूबंदीचा ठराव मंजूर

## महिलांच्या पुढाकारातून ग्रामसभेत निर्णय



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील ऐतिहासिक आणि अध्यात्मिकतेचा वारसा लाभलेल्या चिरनेर गावात अखेर महिलांच्या पुढाकारातून दारूबंदीचा ठराव घेण्यात आला आहे.

हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला असून, या वेळी महिलांची अधिक उपस्थिती असल्याने या ठरावाला चिरनेर गावातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, मंगळवार, ३० डिसेंबर रोजी चिरनेर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत घेण्यात आलेल्या ठरावा संदर्भात योग्य ती कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड, उरण तहसीदार उरण पोलीस ठाणे, उरण पंचायत समिती, उत्पादन शुल्क विभाग उरण, या संबंधित खात्यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. उरण तालुक्यातील चिरनेर गाव परिसरात गावठी दारूची मोठ्या प्रमाणात विक्री केली जात आहे. तसेच देशी दारूचीही मोठ्या प्रमाणावर दुकाने आहेत.

अवैध गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्री वाहतुकीला बंदी असताना नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीररित्या टपऱ्या टपऱ्यांवर या पदार्थांची विक्री केली जात आहे, मात्र दारूच्या आणि गुटख्याच्या व्यसनात तरुण पिढी अडकत चालली आहे. अनेक तरुण या व्यसनामुळे मृत्यूच्यादारात सापडले आहेत. तरुणांच्या व्यसनाधिनतेमुळे लग्न झालेल्या काही महिलांना नेहमीच्या कलहामुळे माहेरी थांबावे लागले आहे. तर अनेक महिलांचे या दारूमुळे कुंकू पुसले गेले आहे.

आदिवासी बांधवदेखील या व्यसनात अडकले असून, व्यसनाधीन होत चाललेला तरुण आदिवासी युवक मृत्यूला कवटाळत आहेत. व्यसनाधीन होत चाललेल्या अबालवृद्ध व तरुणांमुळे अनेक संसार उध्वस्त होऊ लागले आहेत. दारूमुळे अनेक कुटुंबांमध्ये कलह दिसून येत आहेत. गावातील शांतताही लोप पावत चालली आहे. गावातील वाढते गावठी दारूचे गुते, बेकायदेशीर देशी दारूची दुकाने बंद करण्यात यावीत, या मागणीसाठी महिलांनी येथील पोलिसांकडेही तक्रारी केल्या आहेत. मात्र अनेकदा केलेल्या तक्रारीकडे पोलिसांकडून दुर्लक्षच केले जात असल्याचे महिलांकडून सांगितले जात आहे, मात्र मृत्यूच्या घटना आणि कुटुंब कलहाला कुठेतरी आळा बसावा या उद्देशातून अखेर चिरनेर गावातील महिलांनी पुढाकार घेतला. त्यांनी दारूबंदी करिता एक पाऊल पुढे टाकून, महिलांच्या मागणीनंतर चिरनेर गावातील अवैध गावठी दारूचे गुत्ते, देशी दारूची दुकाने बंद करून दारूबंदी करण्याचा ठरावच मंगळवारी ३० डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेत मंजूर करण्यात आला आहे.

## ‘लाईफ लाईन’तर्फे पनवेल वाहतूक शाखेला लोखंडी २० बॅरिकेट सुपूर्द

**पनवेल :** लाईफ लाईन हॉस्पिटल यांनी पनवेल वाहतूक शाखेला बंदोबस्तासाठी २० लोखंडी बॅरिकेट मदत केली.

तत्कालीन पोलीस निरीक्षक संजय शांताराम पाटील यांच्या समन्वयातून पनवेल शहर वाहतूक शाखेसाठी लाईफ लाईन हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश पाटील आणि जयश्री पाटील यांच्या वतीने पनवेल वाहतूक शाखेला २० लोखंडी बॅरिकेट देण्यात आले.

या वेळी पनवेल वाहतूक शाखेचे वपोनि औदुंबर पाटील व इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी श्री व सौ डॉ. प्रकाश पाटील तसेच पो. नि. संजय शां. पाटील गुन्हे यांचे व हॉस्पिटल स्टाफचे वपोनि पाटील यांनी आभार मानले.



## फुंडे विद्यालयामध्ये इनोव्हेशन फेअर उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन सोसायटी जनरल सिक्युरिटी सर्विस वतीने तुकाराम हरी वाजेकर फुंडे शाखेत सोमवारी (दि.२९) इनोव्हेशन फेअरचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या हस्ते उद्घाटन झाले



अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशनच्या वतीने डिझाईन थिंकिंग प्रोजेक्ट राबविण्यात आला. यामध्ये विद्यार्थी डिझाईन थिंकिंगच्या पाच पायऱ्या वापरून आपल्या दैनंदिन जीवनातील समस्या शोधतात व त्यावर एक उपाय म्हणून मॉडेल तयार करतात. या मॉडेलचे प्रदर्शन शाळेमध्ये आयोजित करण्यात आले होते यात एकूण १७ मॉडेल होते.

या मध्ये रिवर क्लीनर, सर्पदंश सुरक्षा, नैसर्गिक रंग निर्मिती, सौर उर्जे वर चालणारी कार, स्मार्ट बोर्ड, स्मार्ट मेडिसिन बॉटल असे समाजाला उपयोगी असणारे विविध मॉडेल होते. या मॉडेलचे परीक्षणाचे काम कॅटलायझर प्रियांका पाटील यांनी केले. शाळेतील ४५० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली व मॉडेल पाहिले. इनोवेशन फेअरचे नियोजन सुचिता म्हात्रे यांनी केले होते. उपप्राचार्या एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एम. बाबर, एस. एस. पाटील व सर्व सेवकवृंद उपस्थित होते. प्रास्ताविक व स्वागत विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनी केले.

## रायगड जिल्हा वैश्य समाज महिला संघातर्फे साहस संस्कार शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा वैश्यसमाज महिला संघ यांच्या वतीने आयोजित साहस संस्कार शिबिर २०२५ (वर्ष तृतीय) हा उपक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला.

या शिबिराचे आयोजन शामल सुंदर आंग्रे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले असून मीरा मनोज आंग्रे (अध्यक्ष, सांस्कृतिक कमिटी, महिला संघ) यांच्या पुढाकारातून या उपक्रमास विशेष चालना मिळाली. या शिबिरासाठी हर्षला योगेश तांबोळी (उपाध्यक्ष, रायगड जिल्हा महिला संघ), अर्चना आशिष झिंजे (उपाध्यक्ष, संस्कृती कमिटी), प्रगती प्रदीप दलाल (अध्यक्ष, क्रीडा समिती), रसिका महाजन तसेच सर्व महिला कमिटी सदस्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक योगदान दिले.

जवळपास ६० मुलांसाठी दोन दिवसांचे साहस संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मुलांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षीस वितरण कार्यक्रमदेखील पार पडला.

या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना मोबाईलच्या आभासी विश्वातून बाहेर काढून संस्कार, साहस, शिस्त व संघभावना यांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देण्यात आले. समाजातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी असा उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थित पालक व समाजबांधवांकडून आयोजकांचे विशेष कौतुक करण्यात आले.





**पनवेल : भाजप महिला मोर्च्याच्या उलवे नोड १च्या अध्यक्ष निकिता खारकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते रविशेठ पाटील, पनवेल पश्चिम मंडल अध्यक्ष रूपेश धुमाळ, गव्हाण जिल्हा परिषद अध्यक्ष निलेश खारकर, वहाळ पंचायत समिती अध्यक्ष वितेश म्हात्रे, उलवे नोड २ अध्यक्षा योगिता भगत, अस्मिता भगत, प्रिया शिंदे, आशा डे, सक्हो कुंभार, प्रविणा पाटील, बाळुशेठ पाटील, गायकवाड गुरुजी, सुहास गोंधळी, दिपक गोंधळी, प्रणय कोळी, प्रवीण ठाकूर, शैलेश भगत, गणेश पाटील, भानुदास कडू, विकी घरत, संतोष पाटील, स्वप्नील म्हात्रे, प्रतिश पाटील, अनुप भगत, नंदू ठाकूर अंकुश ठाकूर आदी उपस्थित होते.**

## श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाचे १४वे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात मान्यवरांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि.३०)झाले. अल्पावधीत नावारूपाला आलेल्या या विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या उत्साहात आणि जोमात पार पडले.



या वार्षिक स्नेहसंमेलनात पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी, प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांनी तसेच उच्च प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य सादर केले. मान्यवरांच्या उपस्थितीत विविध क्षेत्रात प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. बक्षीस वितरण समारंभात देखील मान्यवरांच्या हस्ते अगदी पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांपासून ते उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमावेळी शिक्षण प्रसारक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारित छोटी नाटिकादेखील विद्यार्थ्यांनी सादर करत लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांना त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त नाटिकेद्वारे शुभेच्छा दिल्या. भारावून टाकतील असे नृत्य सादर करत सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात कार्यक्रमाची शोभा वाढवली वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा एक मंच. आणि अशा या मंचावर विद्यार्थ्यांनी आपली कला सादर करत सर्व पालकांचे तसेच मान्यवरांचे स्वागत केले.



कार्यक्रमावेळी स्नेहल पाटील यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन करत मान्यवरांचे तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे शाब्दिक स्वागत केले. या वेळी असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस किशोर गायके, सीनियर पोलीस इन्स्पेक्टर जोशी, जे. बी. एस. पी. संस्थेचे व्हॉइस चेअरमन वाय. टी. देशमुख, ॲड. राहुल घरत, शेखर तांडेल, मेघनाथ तांडेल, सुनील पाटील, सुरेश पाटील, सीमा घरत, एमएनएम विद्यालयाचे चेअरमन भार्गव ठाकूर प्राचार्या सायली वडवलकर, रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर च्या प्राचार्या निशा नायर, माधुरी प्रभू व शमा म्हात्रे आदी उपस्थित होते.

या भव्य दिव्य कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन माननीय चंद्रकांत घरत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी सर्व मान्यवरांचे, तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने विद्यालयाचे १४वे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.

## ‘दिबां’ना अभिवादन करून भाजपच्या उमेदवारांनी प्रभाग १४ मध्ये भरला अर्ज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रभाग क्रमांक १४ हा केवळ भौगोलिक परिसर नसून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक चळवळींचे दीर्घकाळ केंद्रबिंदू राहिलेला प्रभाग आहे. याच प्रभागात स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांचे ‘संग्राम’ हे निवासस्थान असून, त्यांच्या जीवनकाळात येथूनच असंख्य आंदोलनांना, संघर्षांना आणि जनहिताच्या लढ्यांना दिशा मिळाली. त्या ठिकाणी जाऊन भाजपच्या चारही उमेदवारांनी त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. या ठिकाणी नतमस्तक होऊन मंगळवारी उमेदवारी अर्ज भरला.





सामाजिक अन्यायाविरोधात ठाम भूमिका, सामान्य माणसाच्या हक्कांसाठी अखंड संघर्ष आणि सकारात्मक ऊर्जेचा झरा म्हणून ओळखले जाणारे लोकनेते दि. बा. पाटील हे आजही अनेकांसाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या वास्तव्याने हा पनवेल शहरातील ५२ बंगला परिसर विचारांची शाळा आणि जनआंदोलनांचे केंद्र बनला होता. याच प्रभागातून सतीश दत्तात्रेय पाटील यांच्यासह इकबाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत आणि रेणुका मयुरेश नेतकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. मंगळवारी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यापूर्वी या चारही उमेदवारांनी संग्राम निवासस्थानी जाऊन लोकनेते दि. बा. पाटील यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले आणि त्यांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन केले.

या वेळी दि. बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील तसेच कुटुंबीयांनी उमेदवारांचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या. दि. बा. पाटील हे समाजाचे प्रेरणास्थान आणि सकारात्मक ऊर्जेचे केंद्र होते. त्यांच्या वास्तव्य असलेल्या प्रभागातून निवडणूक लढवण्याचे भाग्य आम्हाला मिळाले. रिंगणात उतरण्यापूर्वी त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून आम्हाला लढ्याची नवी ऊर्जा मिळाली अशी प्रतिक्रिया उमेदवार सतीश पाटील यांनी दिली. दरम्यान या चारही उमेदवारांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही प्रभाग क्रमांक १४ मधील भाजप उमेदवारांना शुभेच्छा देत विजयासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या विचारांची शिदोरी घेऊन प्रभाग १४ मध्ये विकास, सामाजिक न्याय आणि लोकहिताचा लढा अधिक बळकट करण्याचा निर्धार या उमेदवारांनी यावेळी व्यक्त केला.

## संपादकीय

# नववर्षाचे उमेदीने स्वागत

सरत्या २०२५ मध्ये निरनिराळ्या कारणांमुळे जागतिक अर्थव्यवस्था विविध आव्हानांना तोंड देत होती. सध्या जगातले बहुतेक देश आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. अशात भारतीय अर्थव्यवस्थेने मात्र आपली घोडदौड कायम ठेवली असून जपानला मागे टाकून भारतीय अर्थव्यवस्थेने जगातील चौथ्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेचा मान मंगळवारी अधिकृतरित्या मिळवला. सरत्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी ही बातमी तमाम देशवासियांपर्यंत पोहोचली व ती नक्कीच सगळ्यांना आनंदित करणारी ठरली आहे.

**रशिया-युक्रेन युद्धाच्या झळा २०२५च्या आधीपासूनच अवघ्या जगाला जाणवत होत्या. त्यातच इस्रायल-पॅलेस्टाइन संघर्षाची भर पडली. गेल्या जानेवारीत पुन्हा एकदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदी विराजमान झालेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला महान बनवण्याच्या आवेशात जगातील अनेक देशांविरोधात ज्यादा आयातशुल्काचा बडगा उगारला आणि जागतिक व्यापारावर त्याचा मोठा परिणाम झाला. भारतावर तर त्यांनी ५० टक्के आयातशुल्क लादले. या आव्हानाला भारत आपल्या परीने तोंड देतो आहे. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थ नेतृत्वाखाली देशाची अर्थव्यवस्था आपली प्रगती कायम राखून आहे याची पोचपावती २०२५ चा अखेरचा सूर्यास्त होण्यापूर्वीच आपल्याला मिळाली. सरते वर्ष अवघ्या जगभरासाठीच चढउतारांचे गेले आहे. पण या बातमीमुळे भारतीयांना नक्कीच नव्या उमेदीने आणि उत्साहाने २०२६ ला सामोरे जाता येईल. तसे पंचांगानुसार आपले मराठी जनांचे नववर्ष गुढीपाडव्याला सुरू होत असले तरी जागतिक स्तरावरचे नवे सौरवर्ष अवघ्या भारताप्रमाणे महाराष्ट्रातही मोठ्या उत्साहात साजरे केले जाते. एकेकाळी अवघ्या जगात ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य कधीही मावळत नसे असा ब्रिटनसारखा देशही आज अनेक आर्थिक आव्हानांशी लढतो आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य महासत्तेसमोरील आर्थिक आव्हानेही जगजाहीर आहेत. अशा या अस्थैर्याच्या कालखंडात भारत मात्र जोमाने पावले टाकत पुढे चालला आहे हे चित्र निश्चितच सगळ्या देशवासियांसाठी खूपच सुखावणारे आहे. एकीकडे देशाच्या अर्थव्यवस्थेची ही यशस्वी घोडदौड सुरू असताना महागाई, बेरोजगारी अशा समस्यांविषयीचे आपले भानही कायम आहेच. त्यांच्या सुयोग्य निराकरणाच्या दृष्टीने मोदी सरकार नक्कीच प्रभावी उपाययोजना करते आहे. तूर्तास एकेकाळी ज्या जपानकडे आपण अतिशय आदराने व आदर्श म्हणून पाहात असू, त्या जपानला आपल्या अर्थव्यवस्थेने मागे टाकले आहे ही बातमी हरखून टाकणारीच म्हणावी लागेल. सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारताने आपली ओळख कायम ठेवली आहे. वाढलेली देशांतर्गत मागणी आणि ठोस संरचनात्मक सुधारणांमुळे ही वाढ शक्य झाली आहे असे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले आहे. जागतिक व्यापारातील अनिश्चितता कायम असूनही ही भरभक्कम वाढ साध्य करण्यात भारताला यश आले आहे. सरकारी आकडेवारीनुसार २०३० पर्यंत म्हणजे येत्या चार वर्षांत देशाचा जीडीपी ७.३ लाख कोटी डॉलरपर्यंत पोहोचेल असा अंदाज व्यक्त केला जातो आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अत्यंत काटेकोर नियोजनातून ही यशस्वी वाटचाल साध्य केली आहे. नव्या वर्षात काही जुन्याच तर काही नव्या आव्हानांना तोंड देणे कुठल्याच देशाला चुकणार नाही. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खंबीर नेतृत्वावर विसंबून भारत आणि तमाम भारतीय नव्या उमेदीने आणि आत्मविश्वासाने अनेक आशाआकांक्षांच्या पूर्ततेची स्वप्ने सोबत घेऊन २०२६ चे स्वागत करतील यात शंका नाही.**

# परसुले धरणासाठीचे जमीन व्यवहार रखडले



पोलादपूर तालुक्यातील धरणप्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याकामी अक्षम्य दूर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाकडून पैठण गोळेगणी परसुले धरणाच्या भूसंपादनाचा मोबदला देण्यातही हलगर्जीपणा करण्यात आल्याचे दिसून येत आहे. पैठण आणि गोळेगणीतील शेतकऱ्यांना मोबदला दिला गेला असताना परसुलेतील शेतकरी मोबदल्यापासून वंचित ठेवण्यात आले आहेत. परराज्यातील लोकांकडून परसुले गावातील जमीनखरेदी मोठया प्रमाणात झाल्याची माहिती प्राप्त होत असताना या व्यवहारांपासून स्थानिक शेतकरी अनभिज्ञ ठेवले गेले आहेत. पोलादपूर तालुक्यातील किनेश्वर धरणाच्या सभोवती परराज्यातील एका व्यक्तीने ज्याप्रमाणे कमाल जमीन धारणा कायद्याचे उल्लंघन करीत जमिनीखरेदी केल्याची माहिती चर्चेत आली; त्याचप्रमाणे परसुले येथेदेखील परराज्यातील काही लोकांकडून तब्बल ५०० एकरांहून अधिक जमिनींची खरेदी करण्यात आल्याची धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यात विकासकामांना सामाजिक, राजकीय, संघटना आणि प्रशासनाची जोड मिळाली की त्यानंतर ज्यांच्यासाठी विकास साधला जात आहे, त्यांच्यावरच अन्याय करण्याची सुप्त इच्छाशक्ती हळूहळू उघड-उघडपणे दिसून येऊ लागली आहे. पोलादपूर तालुक्यातील धरणप्रकल्पांमध्ये अशाप्रकारची अन्यायकारी प्रवृत्ती अनेक बाधितांना अनुभवण्यास मिळाली आहे. पैठण धरण हे अशा सुप्त इच्छाशक्तीतून बाधितांवर अन्याय करण्याचे उदाहरण ठरू पाहात आहे.

लोहारे, तुर्भे, किनेश्वरवाडी, चांभारगणी, कोतवाल, कोंढवी, बोरघर, पैठण असे आठ धरणप्रकल्प नव्याने होण्यासाठी नारळफोडी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी होऊन तालुक्याला पुन्हा एकदा सुजलाम् सुफलाम् होण्याची दिवास्वप्ने पडू लागली. याखेरिज, देवपूर-गांजवणे तसेच ढवळे, कामथे, निवे या भागातील नियोजित धरण प्रकल्प पाटबंधारे विकासाचा अनुशेष नसल्याचा चुकीचा अहवाल राज्यसरकारकडे आल्याने प्रस्तावांच्या बासणांतच बंद राहिले. या धरणांच्या कामांच्या निविदा अथवा कोणतीही कार्यवाही सुरू नसताना कथित ठेकेदार आणि त्यावर काम करण्यासाठी महसूल विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी अशी यंत्रणा कागदोपत्री हलवाहलव करीत होती, मात्र कोणत्याही योजनांचे प्रत्यक्षात काम सुरू झाले नसताना २०१८ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी जमिनी खरवडून माती काढण्यासोबतच दगडी आणि झाडे तोडून धरणाचे काम सुरू झाल्याचा दावा सुरू झाला होता. महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास आणि जलसंधारण लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ ठाणे यांनी लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग माणगांव जि.रायगडच्या माध्यमातून सन २००८-२००९ दरम्यान तयार केलेल्या टिपणी अहवालानुसार पोलादपूर तालुक्यातील विविध धरणांबाबत देवळे लघुपाटबंधारे योजना, लोहारे लघुपाटबंधारे योजना, तुर्भे खोंडा लघुपाटबंधारे योजना, किनेश्वरवाडी लघुपाटबंधारे योजना, चांभारगणी महाळुंगे लघुपाटबंधारे योजना, कोतवाल लघुपाटबंधारे योजना, कोंढवी साठवण तलाव आणि बोरघर लघुपाटबंधारे योजना सुरू होण्यासंदर्भात तपशिलवार अहवाल शासनाला सादर करण्यात आला होता.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

देवपूर-गांजवणे तसेच ढवळे, कामथे, निवे या भागातील नियोजित धरण प्रकल्प पाटबंधारे विकासाचा अनुशेष नसल्याचा चुकीचा अहवाल राज्यसरकारकडे आल्याने प्रस्तावांच्या बासणांतच बंद राहिले. माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर.अंतुले यांनी डॉ.एस.स्वामीनाथन समितीमार्फत केलेल्या पाहणीमध्ये शिवकालीन धरण व तलावासारखे जल व विद्युत प्रकल्प करण्याचा अहवाल तयार करण्यात आला. त्यावर अंमलबजावणी होण्यापूर्वीच पाटबंधारे विकासाचा अनुशेष नसल्याचा अहवाल तयार करून झारीतील शुक्राचार्यांनी कोकणाच्या विकासाचा मार्गच रोकून धरला. यासंदर्भात, महाड पोलादपूर विधानसभा मतदार संघाचे तत्कालीन आमदार माणिक जगताप आणि तत्कालीन विधानपरिषद सदस्य जयंत पाटील यांनी तत्कालीन राज्यपाल डॉ.जमीर यांची भेट घेऊन अहवाल रद्द करण्याची विनंतीही केली होती. त्यानंतर या धरणांच्या कामांच्या निविदा अथवा कोणतीही कार्यवाही सुरू नसताना कथित ठेकेदार आणि त्यावर काम करण्यासाठी महसूल विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी अशी यंत्रणा कागदोपत्री हलवाहलव करीत होती.

पोलादपूर तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडवायला विलेपार्ले, अंधेरी अथवा बांद्र्यातून कोणी येणार नसून आम्ही आणि इथले कार्यकर्ते तत्परतेने येऊ. धरणासाठी जमिनी देणाऱ्यांच्या मनात मोबदल्याबाबत शंका असणे स्वाभाविक आहे. मात्र, जलसंपदा खात्याचे वाटप न झाल्याने राज्याचे तत्कालिन मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून बाधितांच्या मागण्यांपेक्षाही अधिक मिळवून देण्याचा शब्द देत असल्याची ग्वाही महाड विधानसभा मतदार संघाचे सदस्य तत्कालीन बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रतोद आ. भरत गोगावले यांनी पैठण गोळेगणी परसुले धरणाच्या भुमिपूजनप्रसंगी दिली होती. याचा अर्थ शेतकऱ्यांचे हित पाहिले जाईल, असा सकृतदर्शनी दिसून आला तरी कोणीतरी विलेपार्ले, अंधेरी अथवा बांद्र्यातील या परसुले भागात येत असल्याचा गर्भितार्थदेखील स्पष्ट होत असल्याचे जाणवत होते.

सद्यस्थितीत पैठण गोळेगणीतील धरणग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळाला असून परसुले या गावातील धरणग्रस्तांना मोबदल्याची रक्कम मिळाली नाही. याबाबत महसूल यंत्रणा मोबदल्यासाठी प्रयत्नशील राहण्याऐवजी चक्क परसुले गावातील शेतजमिनीची परराज्यातील धनदांडग्यांना विक्री करण्यात आल्याची नोंद सातबारा उताऱ्यांवर घालून परराज्यातील धनदांडग्यांच्या नांवे करण्यात मग्न असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.


'लॅण्ड स्किम' बनलेय 'लॅण्ड स्कॅम'

एका बहुचर्चित 'लॅण्ड स्किम'चा संदर्भ तिच्या वादग्रस्त सामूहिक गुंतवणूक योजनेशी (सीआयएस) आहे, ज्यामध्ये कंपनीने हॉलिडे होम्स, वृक्षारोपण आणि रिसॉर्टर्समधून परतावा देण्याचे आश्वासन देऊन लोकांकडून बेकायदेशीरपणे पैसे गोळा केले, परंतु नंतर ती कंपनी दिवाळखोर झाली. भारतीय सिक्युरिटीज एँड एक्सचेंज बोर्ड (सेबी) ला असे आढळले की 'लॅण्ड स्किम' एक बेकायदेशीर निधी-संकलन योजना चालवत होती. यामुळे सेबीचा हस्तक्षेप, मालमत्तांचा लिलाव आणि गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबद्दल तिच्या संचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. ग्रीन एकर्स योजनतील गुंतवणूकदारांप्रमाणेच, अनेकांचे धनादेश न वटल्याने त्यांना मोठया प्रमाणात नुकसान झाले. अखेरीस कंपनीचे दिवाळे काढून मालमत्ता विकण्यासाठी ताब्यात घेण्यात आले आणि पीडित ठेवीदारांचे पैसे वसूल करण्यासाठी लिलाव आयोजित करण्यात आले. या 'लॅण्ड स्किम' मधील अनेक न्यायालयीन खटले दाखल झाले, ज्यात २०२४ मध्ये काही संचालकांना काही आरोपांमधून निर्दोष मुक्त करण्यात आले, परंतु गुंतवणूकदारांच्या वसुलीसाठीचा संघर्ष अनेक वर्षे सुरू राहिला. मीन योजना ही एका व्यापक फसव्या गुंतवणूक योजनेचा भाग होती, जिथे जमीन आणि मालमत्ता तारण म्हणून किंवा आश्वासनाचा भाग म्हणून वापरली गेली. संचालकांच्या नावाने खरेदी केलेल्या जमिनींची विक्री आता संचालक तसेच त्यांचे हस्तक काही आरोपांमधून निर्दोष सुटल्यानंतर सुरू झाली असून तपास यंत्रणांना तसेच महसूली यंत्रणांमध्ये याबाबत फारसे स्वारस्य नसल्याने आता 'लॅण्ड स्कॅम' सुरू होत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# 'या' ॲपवरसुद्धा होणार व्हॉट्सॲपवर स्टेटस शेअर

सोशल मीडियावर असे अनेक प्लॅटफॉर्म आहेत, ज्यांच्या मदतीने आपण अनेक गोष्टी शेअर करीत असतो,



पण अनेकदा असं होतं की, आपल्याला सगळ्यात प्लॅटफॉर्मवर एकत्र फोटो टाकणं शक्य होत नाही आणि आपल्याला विविध ॲपवर जाऊन वेगवेगळे स्टेटस टाकावे लागतात. आता व्हॉट्सॲप एक भन्नाट फीचर घेऊन येत आहे, ज्यात तुम्ही व्हॉट्सॲपवरून दुसऱ्या ॲपवरसुद्धा स्टेटस शेअर करू शकणार आहात.

व्हॉट्सॲपवर तुम्ही पोस्ट केलेले व्हिडीओ, फोटो तुम्ही आता इन्स्टाग्राम ॲपवरसुद्धा शेअर करू शकणार आहात. व्हॉट्सॲप एका नवीन फीचरवर काम करीत आहे; ज्यामुळे युजर्स व्हॉट्सॲप स्टेटस अपडेट इन्स्टाग्रामवरसुद्धा शेअर करू शकतील. तुम्ही आता जसं इन्स्टाग्राम स्टोरीज फेसबुक स्टोरीजवर शेअर करू शकता अगदी त्याचप्रमाणे हे असेल. विशेष म्हणजे या फीचरवर सध्या काम चालू आहे.

१. सगळ्यात पहिला सेटिंगमध्ये जा.
२. त्यानंतर प्रायव्हसी हा पर्याय निवडा.
३. त्यानंतर स्टेटस या पर्यायावर क्लिक करा.
४. तुम्हाला स्टेटस प्रायव्हसी दिसेल.
५. त्याच्या खाली तुम्ही पोस्ट केलेले स्टेटस तुम्हाला कोणाला दाखवायचा आहे यासाठी तीन पर्याय तिथे दिसतील.
६. तर त्याच्याच खाली 'शेअर माय स्टेटस अपडेट्स क्रॉस माय अकाउंट्स' असा एक पर्याय दिसेल. तिथे फक्त फेसबुक हा पर्याय सध्या तरी उपलब्ध आहे. पण, काही दिवसांनी व्हॉट्सॲप उपडेट झाल्यानंतर फेसबुकच्या खाली तुम्हाला इन्स्टाग्राम हा पर्यायसुद्धा दिसेल; जेणेकरून तुम्ही व्हॉट्सॲपवर पोस्ट केलेले स्टेटस फेसबुकबरोबर इन्स्टाग्रामवरसुद्धा अगदी सहज शेअर करू शकता.

व्हॉट्सॲपचे हे फीचर अपडेट झाल्यानंतर फेसबुक किंवा इन्स्टाग्राम स्टोरीजवर कोणते स्टेटस अपडेट करायचे हे ठरवण्याचे नियंत्रण वापरकर्त्याकडे असेल. कोणत्याही वेळी वापरकर्त्यांना सेटिंग ऑन किंवा ऑफ करण्याचा पर्यायदेखील उपलब्ध असेल. व्हॉट्सॲप अँड्रॉइड ॲपच्या बीटा व्हर्जनवर तुम्हाला हे फीचर दिसेल. मेटा सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी हा पर्याय युजर्सना लवकरच हे फीचर वापरकर्त्यांसाठी आणले जाईल, असे सांगितले आहे.

# भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस



**निमित्त**

भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस हे सैद्धांतिक भौतिकशास्त्रात तज्ज्ञ असलेले भारतीय गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ होते. बोस सांख्यिकी आणि बोस कंडेन्सेटच्या सिद्धांताचा पाया विकसित करण्यासाठी १९२० च्या सुरुवातीच्या काळात क्वांटम मेकॅनिक्सवर केलेल्या कामासाठी ते प्रसिद्ध आहेत. रॉयल सोसायटीचे फेलो, त्यांना भारत सरकारकडून १९५४मध्ये भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार, पद्मविभूषण, प्रदान करण्यात आला. आज त्यांच्या जन्मदिवशी कार्याचा घेतलेला धांडोळा...

बोस-आइन्स्टाईन जोडीतील विश्वविख्यात शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ यांचा जन्म १ जानेवारी १८९४ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील सुरेंद्रनाथ हे रेल्वेत नोकरीला होते. बोस यांचा जन्म कलकत्ता येथे झाला. ते बंगाली कायस्थ कुटुंबातील सात मुलांपैकी सर्वात मोठे होते. त्यांचे शालेय शिक्षण वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या घराजवळ सुरू झाले. जेव्हा त्यांचे कुटुंब गोबागन येथे गेले तेव्हा त्यांना न्यू इंडियन स्कूलमध्ये दाखल करण्यात आले. शाळेच्या शेवटच्या वर्षात त्याला हिंदू शाळेत प्रवेश मिळाला. १९०९मध्ये त्यांनी प्रवेश परीक्षा (मॅट्रिक) उत्तीर्ण केली. पुढे ते प्रेसिडेन्सी कॉलेज, कलकत्ता येथे इंटरमिजिएट सायन्स कोर्समध्ये सामील झाले, जिथे त्यांच्या शिक्षकांमध्ये जगदीश चंद्र बोस, शारदा प्रसन्न दास आणि प्रफुल्ल चंद्र रे यांचा समावेश होता.

बोस यांना प्रेसिडेन्सी कॉलेजमधून मिश्र गणित विषयात विज्ञान पदवी प्राप्त झाली. १९१३मध्ये ते प्रथम आले. त्यानंतर त्यांनी आशुतोष मुखर्जी यांच्या नव्याने स्थापन झालेल्या विज्ञान महाविद्यालयात प्रवेश घेतला. जिथे ते पुन्हा १९१५मध्ये एमएससी मिश्रित गणिताच्या परीक्षेत प्रथम आले. एमएससी पूर्ण केल्यानंतर बोस १९१६मध्ये कोलकाता विद्यापीठाच्या सायन्स कॉलेजमध्ये रिसर्च स्कॉलर म्हणून रुजू झाले आणि त्यांनी सापेक्षतेच्या सिद्धांतावर अभ्यास सुरू केला. क्वांटम सिद्धांत नुकताच क्षितिजावर दिसला होता आणि महत्त्वाचे परिणाम दिसायला लागले होते. बोस यांना बंगाली, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन आणि संस्कृत तसेच लॉर्ड टेनिसन, रवींद्रनाथ टागोर आणि कालिदास यांच्या कविता यांसारख्या अनेक भाषांमध्ये पारंगत होते. ते व्हायोलिनसारखे भारतीय वाद्य एसराज वाजवू शकत होते. वर्किंग मेन्स इन्स्टिट्यूट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रात्रीच्या शाळा चालवण्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता.

बोस यांनी साहा यांच्यासमवेत १९१८पासून सैद्धांतिक भौतिकशास्त्र आणि शुद्ध गणितामध्ये अनेक पेपर्स सादर केले. १९२४मध्ये ढाका विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात वाचक म्हणून काम करत असताना, बोस यांनी शास्त्रीय भौतिकशास्त्राचा कोणताही संदर्भ न घेता प्लँकच्या क्वांटम रेडिएशन कायद्याची व्युत्पन्न करणारा एक शोधनिबंध लिहिला. क्वांटम स्टॅटिस्टिक्सचे महत्त्वाचे क्षेत्र तयार करण्यात हा पेपर महत्त्वाचा होता. प्रकाशनासाठी लगेच स्वीकारले नसले तरी त्यांनी तो लेख थेट जर्मनीतील अल्बर्ट आइनस्टाईन यांना पाठवला. आइन्स्टाईनने पेपरचे महत्त्व ओळखून स्वतः जर्मन भाषेत भाषांतर केले आणि बोस यांच्या वतीने प्रतिष्ठित Zeitschrift fr Physik यांना सादर केले. सत्येंद्रनाथांना भारत सरकारने पद्मविभूषण पुरस्कार देऊन गौरविले ४ फेब्रुवारी १९७४ रोजी सत्येंद्रनाथांचे हृदय रोगामुळे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात आहारामध्ये 'या' फळांचा करा समावेश

हिवाळ्यामध्ये वातावरण अतिशय थंड असते. त्यामुळे आपण बरेचदा पांघरूणात गुरफटून पडून राहणे पसंत करतो, मात्र ही थंडी सर्दी-खोकल्यासारखे हलके आजार घेऊन येते. आपली हाडे आणि सांधे आखडण्याच्या समस्या उद्‌भवतात. अशावेळेस आहारात जर थंडीच्या दिवसांमध्ये येणाऱ्या फळांचा समावेश केला, तर त्यामधून मिळणारी जीवनसत्वे, फायबर, खनिजे यांसारखे घटक शरीरसाठी उपयुक्त ठरू शकतात.



संत्र या फळामध्ये क जीवनसत्व भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे शरीरातील अनावश्यक घटक बाहेर टाकण्यासाठी डिटॉक्स म्हणून याचा उत्तम वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे संत्र वजन नियंत्रित ठेवण्याकरिता उपयुक्त ठरू शकते. संत्र्यामध्ये फायबर, पोटॅशियम, खनिज यांचे प्रमाण जास्त असून कॅलरीजचे प्रमाण कमी असते. म्हणून संत्री खाल्ल्याने पचनास मदत होऊन, पोट अधिक काळ भरल्यासारखे राहते.

डाळिंब या फळामध्ये फायबर, खनिज आणि अँटिऑक्सिडंट्स भरभरून असतात. त्यासोबतच या फळात कॅलरीज कमी असतात. या फळाचे सेवन व्यायामाआधी किंवा व्यायामानंतर करू शकता.

सफरचंदामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पचन चांगले होण्यासाठी, सोबतच पोट अधिक काळासाठी भरलेले राहण्यास मदत होते. ज्यांना वजन कमी करायचे असेल त्यांच्यासाठी रिकाम्या वेळेत किंवा अवेळी काही खावेसे वाटत असल्यास सफरचंद खाणे उपयुक्त ठरू शकते.

किवीमध्ये प्रचंड प्रमाणात पौष्टिक घटक असून यात क जीवनसत्वे, के जीवनसत्वे, फायबर असतात. कॅलरीजचे प्रमाण कमी असते. आतमधून हिरवे दिसणारे हे आंबटसर फळ एखाद्या सॅलेडची चव आणि पौष्टिकता वाढवण्याचे काम करत असते.

पेरू या फळाला प्रचंड गर असून त्यामध्ये प्रथिने आणि फायबरदेखील भरपूर असतात. वजन कमी करताना पेरू खाणे उपयुक्त ठरू शकते.

चवीला अतिशय गोड लागणारे सीताफळ केवळ चवीत सर्वोत्तम नसून त्यामध्ये पौष्टिक घटकांची रेलचेल असते. यामध्ये अ आणि क जीवनसत्त्वे, काही प्रमाणात लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि कॉपर यांसारखे घटक आढळतात.

# पराडे येथील शाळा वाचविण्यासाठी पालक, शिक्षकांसह विविध सामाजिक संस्था एकवटल्या

**चौक, मोहपाडा : प्रतिनिधी**

महिला उद्योग मंडळ रसायनी यांनी मुलांच्या शिक्षणासाठी सुरू ठेवलेली शाळा कोणत्याही दबावाला बळी न पडता सुरू ठेऊन विद्यार्थी यांचे शिक्षण पूर्ण करू, असा निर्धार पालक, माजी विद्यार्थी, सामाजिक संस्था, विद्यार्थी यांनी केला असून ही संस्था आणि शाळा ताब्यात घेण्याचा प्रयत्न हाणून पाडू, असे सांगितले.

महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा पराडे, मोहोपाडा ता. खालापूर, जि. रायगड येथे असून ती बेकायदेशी असल्याचा आरोप सोशल मीडियावरून व्हायरल झाल्याने आज पालक, माजी विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, संस्था यांची बैठक आयोजित केली होती. या वेळी पत्रकार परिषद देखील झाली, त्यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सरोजनी साजवान यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

एच ओ सी कंपनीमुळे विस्थापित झालेल्या पराडे आदिवासी वाडीतील आदिवासी मुलांना शिक्षणाची काहीच व्यवस्था नव्हती तेव्हा पराडे आदिवासी वाडीला लागूनच कंपनीने दोन खोल्या बांधून या मुलांसाठी शाळा सुरू केली. शाळा सुरु असतांनाच शाळेला मान्यता नसल्याने शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या पुढील शिक्षणासाठी दाखले देतांना अडचण निर्माण झाली. त्यामुळे शाळेला मान्यता घेण्याची असल्यामुळे १९९७-९८ मध्ये महिला मंडळाचे रजिस्ट्रेशन घेऊन ही शाळा सुरू करण्यात आली.




सन २००० नंतर रिना रामचंदन यांनी कंपनी सोडली. आणि कंपनीने शाळेला देण्यात येणारी मदत हळहळू बंद केली.

आर्थिक अडचणीमुळे फी देऊन शिक्षण घेणाऱ्या मुलांना शाळेत प्रवेश द्यायला सुरुवात झाली. चांगले शिक्षण मिळत असल्याने शाळेतील विद्यार्थी संख्या झपाट्याने वाढत गेली त्यामुळे पराडे येथील दोन खोल्या शाळेसाठी कमी पडायला लागल्या.कंपनीने त्यांच्या माणिक बिल्डिंग मध्ये शिशु वर्गासाठी ज्या खोल्या दिल्या होल्या तेथे शाळा सुरू केली.प्राथमिक विभागात ८०३ तर शिशु वर्गात ५१० अशी एकूण १३५३ विद्यार्थी संख्या आहे.मराठी माध्यमाची एक चांगली शिक्षण देणारी शाळा म्हणून रसायनी मोहोपाडा खालापूर परिसरात शाळेचे नाव झाले आहे.

दरम्यान एच ओ सी कंपनीने आपली कंपनी विकून बी पी सी एल यांना विकली शाळेची इमारत नादुरुस्त असून त्यामुळे विद्यार्थी यांच्या जीविताला धोका आहे, अशा खोट्या अफवा पसरविण्यात आल्या,त्या दुसऱ्या कंपनीला विकायच्या असल्यामुळे शाळा इमारत अनाधिकृत ठरवून बंद पाडण्याचा डाव रचना जात आहे, असा आरोप महिला मंडळाच्या अध्यक्षा यांनी केला.

उच्च प्राथमिक आठवी वर्ग विना अनुदानित आहे.पहिली ते सातवी शाळेला ६०% अनुदान आहे हे शिक्षक अनुदान असून ते फक्त ८ शिक्षकांनाच मिळालेले आहे. शाळेला शिक्षकेत्तर अनुदान मिळत नाही प्राथमिक शाळेची पट संख्या ८०३ आहे शासनाच्या संच मान्यता धोरणानुसार शाळेला गेल्या वर्षी १४ शिक्षक मंजूर झाले परंतु अनुदान मात्र ८ शिक्षकांनाच आहे. तसेच विद्यार्थी संख्येनुसार सध्या शाळेत पहिली चार दुसरी चार तिसरी तीन चौथी दोन पाचवी तीन सहावी तीन सातवी तीन आठवी दोन अभ्या २४ तुकड्या असून २४ शिक्षक कार्यरत आहेत. अनुदान ८ शिक्षकांना आहे उर्वरित १६ विनानुदानित शिक्षकाचे मानधन शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मानधन शाळेच्या इतर सुविधा लाईट,पाणी, इमारत देखभाल दुरुस्ती या आणि अश्या सुविधासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांकडून मासिक ३००/३५० रुपये फी घेतली जाते त्याची रीतसर पावती दिली जाते त्याचे ऑडीट केले जाते. ही फी पालक शाळेत चांगले शिक्षण मिळत असल्याने आणि या परिसरातील एक चांगली शाळा म्हणून आपल्या स्वःताच्या मर्जीने देतात. दरवर्षी शाळेत मोठया प्रमाणात ॲडमिशन होतात जागे अभावी ॲडमिशन बंद करावे लागले आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला सक्षमीकरण आणि सबळीकरणासाठी काम, मुलांच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करून लहान मुलाच्या शिक्षणासाठी अधिक प्रयत्न करा असे आवाहन केले आहे, मात्र अरुण गायकवाड ही शाळा ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप केला. दरम्यान अनेक माजी विद्यार्थी, पालक यांनी शाळा व्यवस्थापन यांना पाठिंबा जाहीर करून अनेक पालकांनी शाळेचे कौतुक केले आहे. अनेक सामाजिक संस्था, कायदे पंडित यांनी उपस्थित राहून पाठिंबा जाहीर केला. दरम्यान अरुण गायकवाड यांना संपर्क साधला असता, संपर्क होऊ शकला नाही.

## *एचओसी कंपनी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाने सुरू केलेली शाळा*

***केंद्र सरकारने हिंदुस्थान ऑरगॅनिक कंपनी १९६५ च्या दरम्यान सुरू केली. स्थानिक प्रकल्पग्रस्त, स्थानिक परिसरातील विद्यार्थी यांच्या शिक्षणासाठी सन १९८५ च्या दरम्यान शाळा सुरू केली होती.कंपनी व्यवस्थापनातील महिला अधिकारी आणि पुरुष अधिकारी यांच्या पत्नी एकत्र येऊन त्यांनी १९७८-७९ मध्ये महिला उद्योग मंडळ स्थापन केले. या महिलांनी १९८५ च्या दरम्यान कंपनीच्या एका निवासी इमारतीत लहान मुलांसाठी शिशु वर्ग सुरू केला. लहान मुलांच्या शाळेसाठीची ही जागा एच.ओ. सी. कंपनीने दिली. कंपनीतील कामगार व स्थानिक प्रकल्पग्रस्त यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून ही शाळा सुरू करण्यात आली आहे***

# कर्जत नगर परिषदेमध्ये चारही अपक्ष उमेदवारांची अनामत रक्कम जप्त

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत चार अपक्ष उमेदवारांनी विविध प्रभागांमध्ये निवडणूक लढविली होती. मस्टर त्या चारही उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे

कर्जत नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर रोजी संपन्न झाली होती पण निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार तिचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर झाला. यामध्ये अपक्ष निवडणूक लढविलेल्या चारही उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस , उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि इतर घटक पक्ष यांची परिवर्तन विकास आघाडी स्थापन करण्यात आली होती तर भारतीय जनता पार्टी शिंदे गट शिवसेना आणि आरपीआय यांची महायुती करण्यात आली होती. २१ जागांसाठी त्यामध्ये परिवर्तन विकास आघाडीने २१ महायुतीने २१ असे ४२ उमेदवार उभे केले होते तसेच चार अपक्ष उमेदवारांचा समावेश होता. त्यामुळे नगराध्यक्षापदाचे दोन उमेदवार असे एकूण ४८ जण निवडणूक रिंगणात होते.

प्रभाग क्रमांक - ब मधून जयदीप कृष्णा शिंदे हे उभे होते त्यांना १६२ मते मिळाली प्रभाग क्रमांक ५ ब मधून उमेश अर्जुन शेलार हे उभे होते त्यांना ९ मते मिळाली प्रभाग क्रमांक ९ अ मधून राजेश पिराजी साळुंके हे उभे होते त्यांना २० मते मिळाली तर प्रभाग क्रमांक १० ब मधून नितेश राजेंद्र बाचल यांना २४६ मते मिळाली या चारी उमेदवारांची महाराष्ट्र निवडणूक नियम १९६६ चा कलम १४/ ४ नुसार उमेदवार निवडून न आल्यास त्यास मिळालेल्या वैध मतांची संख्या सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक अष्टमांशपेक्षा अधिक होत नसेल तर त्यांची अनामत रक्कम नगर परिषदेकडे जमा राहते यानुसार या चारही उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

# कुडालेणीला माहितीचा क्युआर कोड प्राप्त

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील प्रसिद्ध कुडे लेणीला क्युआर कोड पुरातत्व विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांचे हस्ते नुकतेच सुरू करण्यात आले आहे. सदर कुडे लेणीची लेणीविषयी माहिती पर्यटकांना होणार आहे. त्यामध्ये १ ते २६ लेण्यांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे कुडे लेणी आता खऱ्याअर्थाने जगासमोर आली असून तळ्याच्या पर्यटनाला चालना मिळून रोजगाराच्या संधी प्राप्त होणार आहेत. या वेळी पुरातत्व विभागाचे अधिकारी डॉ.तेजस गर्जे, अभिजित अंबेकर, गजानन येलीकर आदि उपस्थित होते. कुडे लेणीला क्युआर कोडमुळे पर्यटकांमध्ये आनंद होऊन पर्यटकांमध्ये वाढ होताना दिसत आहे. कुडेलेणीवरील शिल्प चित्र हे पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे.

पर्यटकांची सध्या लेणीवर मोठ्या प्रमाणात गर्दी होताना पहावयास मिळत आहे. विद्यार्थ्याच्या सहलिंचीही संख्या वाढत आहे. पर्यटकांमध्ये वाढ होत असल्याने येथील नागरिकांना रोजगाराच्या संधी वाढत असल्याचे पहावयास मिळत आहे. या लेणी शेजारी अथवा जवळपास एखादे हॉटेल अथवा इतर सुविधा वाढल्यास पर्यटकांना सुविधा प्राप्त होऊन अधिक पर्यटक वाढण्यास मदत होईल.



# थंडीचा जनजीवनावर परीणाम; सर्दी, खोकल्याच्या रुग्णसंख्येत वाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून दाट धुक्यासह कडक थंडीचा जनजीवनावर परीणाम जाणवू लागला आहे. या थंडीमुळे खोकला, अंगदुखी, सर्दीच्या आजारांनी डोकं वर काढलं आहे. आठवडाभरात रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. सरकारी दवाखान्यांबरोबरच खाजगी दवाखान्यांमध्ये अशा रूग्णांची गर्दी दिसून येत आहे.

यावर्षी दिवाळी सणामध्ये थंडीचा अजिबात लवलेश जाणवला नाही, परंतु उशीरा पर्यंत थांबलेल्या परतीच्या पावसामुळे गेल्या आता गेली १५ दिवसांमध्ये अधूनमधून चांगलीच थंडी जाणवत आहे. गेली चार, पाच दिवसापासून एकाकी थंडीने जोर धरला व बोचऱ्या थंडी बरोबर दाट धुकेही पडण्यास प्रारंभ झाल्याने जनजीवनावर त्याचा चांगलाच परिणाम होत असल्याचे पहावयास मिळत

हवामान बदलामुळे आता व्हायरल संसर्गांचे प्रमाण वाढले आहे. सतत येणाऱ्या शिंका, सर्दी-खोकला, अंगदुखी, थकवा यांसारख्या तक्रारी रुग्णांमध्ये सामान्य दिसत आहेत. यामुळे आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे.हवामानातील अचानक बदलामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. विशेषतः लहान मुले, वयोवृद्ध नागरिक आणि गर्भवती महिला या गटाने स्वतः ला जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. पुरेशी झोप, संतुलित आहार, स्वच्छतेकडे लक्ष देणे तसेच हात धुण्याची सवय ठेवणे यावर भर देणे महत्त्वाचे आहे.

लक्षणे दीर्घकाळ टिकल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. औषधोपचाराचा पूर्ण कोर्स घेणे, ताप आणि अंगदुखीवर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे. तसेच काही वेळा व्हायरल संसर्गाची लक्षणे डेंगी किंवा मलेरियासारख्या आजारांसारखी भासू शकतात, असे अलिबाग येथील डॉ. निशिगंध आठवले यांनी सांगितले.

दाट धुके आणि बोचरी थंडी यापासून बचाव करण्यासाठी ठिकठिकाणी सकाळी व सायंकाळी शेकोट्या पेटू लागल्या आहेत. स्वेटर, मफलर, कानटोपी, हातमोजे, घोंगड्या व ब्लॅकेट या उबदार कपड्यांनाही बाजारामध्ये मागणी वाढली आहे. धुक्यामुळे रस्त्याने प्रवास करताना किंवा घरातून बाहेर पडल्यावर समोरचे काहीही दिसत नसल्याने वाहन चालवताना मोठी खबरदारी घ्यावी लागत आहे. सकाळी सात वाजता सूर्य नारायणाचे होणारे दर्शन नऊ वाजले तरी होत नसल्याने धुक्याची तीव्रता लक्षात येत आहे.

# फुलांच्या दुनियेत रमले बालकलाकार, गुंफले आकर्षक फुलांचे आविष्कार



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळेत नुकतीच पार पडलेली पुष्पगुच्छ स्पर्धा ही केवळ एक स्पर्धा न राहता चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा,सर्जनशीलतेचा आणि सौंदर्यदृष्टीचा उत्सव ठरली.

इयत्ता पहिली ते पाचवीतील लहान विद्यार्थ्यांनी आपल्या नाजूक व कोमल हातांनी रंगीबेरंगी कागदांपासून विविध फुलांचे अप्रतिम आविष्कार साकारत संपूर्ण शाळा फुलांच्या दुनियेत न्हाऊन निघाली. देशविदेशातील विविध फुलांची रूपे, आकर्षक रंगसंगती, नक्षीकाम आणि कल्पक सजावटीतून विद्यार्थ्यांनी मनमोहक पुष्पगुच्छ तयार केले. फुले घडवताना ही चिमुकली मुले इतकी रमून गेली होती की तहान-भूक विसरून ते आपल्या कलाकृतीत तल्लीन झाले होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, डोळ्यांतील चमक आणि हातातील सृजनशीलतेचे दर्शन पाहून उपस्थित शिक्षक व पालकही भारावून गेले.

विद्यार्थ्यांच्या अंगी दडलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि कल्पनाशक्तीला योग्य दिशा मिळावीयासाठी शिपुरकर शाळेत सातत्याने विविध कला व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून घेण्यात आलेल्या या पुष्पगुच्छ स्पर्धेत तब्बल ९० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येक विद्यार्थी या स्पर्धे साठी विशेष तयारी करून आला होता. शाळेतील वर्गखोल्यांमध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या लहानग्या कलाकारांनी स्वतः च्या कल्पनांना वेगवेगळ्या आकारात साकारले.

फुलांवरील कलाकुसर,नक्षीकाम आणि सुबक मांडणीने सजलेले पुष्पगुच्छ पाहताना प्रेक्षकांनाही मंत्रमुग्ध व्हावे असे दृश्य निर्माण झाले होते.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना आगामी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात गौरविण्यात येणार असून त्यांना बक्षिसे देण्यात येणार आहेत. मुख्याध्यापिका मनिषा मोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन करत त्यांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले. तसेच शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत अशाच प्रकारे सर्जनशील उपक्रमात सक्रिय राहण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये तयार केलेल्या सर्व कलावस्तूंचे भव्य प्रदर्शन लवकरच भरविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यापक व्यासपीठ मिळणार असून पालक व नागरिकांना चिमुकल्या कलाकारांच्या प्रतिभेचे दर्शन घडणार आहे.

दरम्यान, असे उपक्रम सातत्याने विद्यार्थ्यांसाठी राबविले जातात.

# श्रीवर्धन नगराध्यक्ष ॲड. अतुल चौगुले १ जानेवारीला स्वीकारणार कार्यभार

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी ॲड. श्री. अतुल अरविंद चौगुले यांची बहुमताने निवड झाल्यानंतर त्यांनी स्वच्छ, पारदर्शक व सर्वसामान्य नागरिकांना न्याय देणारे प्रशासन देण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला आहे. आपल्या निवडीबाबत समाधान व्यक्त करताना नगराध्यक्ष चौगुले यांनी सर्व सन्माननीय नगरसेवकांचे, पदाधिकाऱ्यांचे व श्रीवर्धनकर नागरिकांचे आभार मानले आहेत.



नगराध्यक्ष ॲड. अतुल चौगुले यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की,आपल्या सर्वांच्या परिश्रमाने व प्रयत्नांमुळे श्रीवर्धन नगरपरिषदेच्या प्रथम नागरिक म्हणून मला बहुमताने निवडून दिले आहे. या विश्वासाबद्दल मी सदैव कृतज्ञ राहीन. स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रमुख या नात्याने स्वच्छ, पारदर्शक आणि सर्वसामान्य जनतेला न्याय देणारे प्रशासन देण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील.


## पनवेल महानगरपालिका
### ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

ई-मेल : panvelcorporation@gmail.com | दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com | वेबसाईट - panvelcorporation.com

**महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६**
**मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्दीची**
**जाहीर सुचना**

**मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे कडील पत्र क्र. रानिआ/मनपा २०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक. २६/१२/२०२५ च्या सुधारीत वेळापत्रका नुसार पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६ करिता तयार करण्यात आलेल्या प्रभाग क्र. १ ते २० साठी मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या मा. राज्य निवडणूक आयोगाने अधिसुचित केलेल्या सुधारीत कार्यक्रमानुसार नागरीकांच्या माहितीसाठी दिनांक २७/१२/२०२५ ते ०३/०१/२०२६ पर्यत महानगरपालिका निहाय मतदार यादी जस-जशी पुर्ण होईल तस-तशी प्रसिध्द करणेबाबत आदेश आहेत. सदर मतदान केंद्र निहाय मतदार याद्या मा. आयोगाकडुन प्राप्त झाल्या असुन, त्या दि. ०१/०१/२०२६ रोजी खालील ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहेत.**

१) पनवेल महानगरपालिका मुख्यालय (निवडणूक विभाग)
२) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.panvelcorporation.com)
३) महानगरपालिकेची सर्व प्रभाग कार्यालय व उपविभाग नावडे
४) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय

सही/-
(मंगेश चितळे)
निवडणूक अधिकारी तथा आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र. ७२४/७६३/२०२५



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. संदिप जयवंत पाटील** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. संदिप जयवंत पाटील** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कोप्रोली (५५३३३५)**
(PU-ID : 31603938152), **तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १३६/१ **खाते क्र.१११७** | १ | ०.१६.४० पो.ख. ०.०२.८० | २.२५ |
| | | **एकुण ०.१९.२०** | |
| **या एकूण विक्री क्षेत्राचे ०.१९.२०** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/०१/२०२६

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१



## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५ ते २०३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव असाई इंडिया ग्लास कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. तळोजा., ता. पनवेल जि. रायगड असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि.०२/०१/२०२६ ते ०८/०१/२०२६, नामनिर्देशन पत्र छाननी दि.०९/०१/२०२६, नामनिर्देशन पत्र माघारी दि.१३/०१/२०२६ ते २७/०१/२०२६ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक १६/०२/२०२६ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(सुरेखा पाटील)
निवडणूक निर्णय अधिकारी

# पनवेल मनपा निवडणूक प्रशिक्षणाला ५७४ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दांडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या निवडणूक प्रशिक्षणाला मोठ्या प्रमाणावर दांडी मारल्याचे चित्र समोर आले आहे. प्रशिक्षणाचे दोन दिवस पूर्ण झाल्यानंतर सूमारे २३०० कर्मचाऱ्यांपैकी तब्बल ५७४ सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास गैरहजेरी लावल्याची माहिती समोर आली असून, यामुळे महापालिका प्रशासनाची चिंता वाढली आहे.



पनवेल महापालिकेची निवडणूक १५ जानेवारीला होत असल्याने निवडणूक प्रक्रिया सूरळीत पार पडण्यासाठी निवडणूकीत सहभागी होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन पनवेल महापालिकेने शहरातील आद्यक्रांतीवीर वासूदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित केले. बुधवार हा प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्याचा शेवटचा दिवस आहे. सोमवारी व मंगळवारी २२९४ कर्मचाऱ्यांना दिलेल्या प्रशिक्षणात तब्बल ५७४ कर्मचारी व अधिकारी गैरहजर राहीले. महापालिकेला ४२०५ कर्मचारी व अधिकाऱ्यांना निवडणूकीसाठी प्रशिक्षित करायचे आहे.

गैरहजार राहणाऱ्यांपैकी केवळ २० ते २२ कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहण्यात अडचणी असल्याबाबत लेखी अर्ज महापालिकेकडे सादर केले आहेत. उर्वरित दांडी मारणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कोणतेही कारण किंवा सबब निवडणूक विभागाकडे सादर केलेले नसल्याची माहिती महापालिकेचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांनी यांनी दिली.

तसेच प्रशिक्षणास अनुपस्थित राहिलेल्या कर्मचाऱ्यांना तातडीने नोटिसा बजावण्यात आल्या असून, पुढील २४ तासांत गैरहजेरीचे कारण स्पष्ट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आदेशांचे पालन न केल्यास संबंधितांवर राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही निवडणूक अधिकारी चितळे यांनी दिला आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांनी टाळाटाळ केल्याचे सिद्ध झाल्यास निलंबनाची कारवाई सुद्धा करण्याचे अधिकार शासनाला आहेत.

निवडणूक प्रशिक्षणात मतदान प्रक्रिया, ईव्हीएम हाताळणी, मॉक पोल, कायदेशीर बाबी तसेच आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येते, मात्र मोठ्या प्रमाणावर झालेल्या गैरहजेरीमुळे निवडणूक व्यवस्थेच्या तयारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासनाने आता कठोर भूमिका घेतली आहे, अशी प्रतिक्रिया महापालिका वर्तुळात व्यक्त होत आहे.

# नवी मुंबई विमानतळावरून पाच दिवसांत २६ हजारांवर प्रवाशांचा प्रवास

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईच्या पायाभूत विकासातील मैलाचा दगड ठरलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने कार्यारंभाच्या पहिल्याच पाच दिवसांत प्रवासी प्रतिसादाचा ठसा उमटवला आहे.



सुरूवातीपासूनच सातत्यपूर्ण बुकिंग आणि वाढता प्रवासी ओघ दिसून येत असून, अवघ्या पाच दिवसांत २६ हजारांहून अधिक प्रवाशांनी देशातील १३ वेगवेगळ्या शहरांमध्ये विमानतळावरून प्रवास केला आहे.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या पाच दिवसांत एकूण २६,०२१ प्रवाशांनी प्रवास केल्याची माहिती विमानतळ प्रशासनाने दिली.

यामध्ये १२,४३१ आगमन आणि १३,५९० प्रस्थान प्रवाशांचा समावेश आहे. विमानतळाच्या उद्घाटनानंतर लगेचच प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे चित्र असून, मागणी सातत्याने वाढत असल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले.शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवसांत प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ झाली. शनिवारी ५,५४८ तर रविवारी ५,६१४ प्रवाशांनी प्रवास केला. या कालावधीत विमानतळावर एकूण १६२ नियोजित हवाई वाहतूक हालचाली नोंदवण्यात आल्या. यामध्ये ८१ आगमन आणि ८१ प्रस्थान उड्डाणांचा समावेश होता.

सध्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ देशातील १३ प्रमुख शहरांशी जोडलेला आहे. अहमदाबाद, बेंगळुरू, चेन्नई, कोचीन, कोईम्बतूर, दिल्ली, गोवा (मोपा), हैदराबाद, जयपूर, लखनौ, मंगळुरू, नागपूर आणि वडोदरा या शहरांसाठी नियमित उड्डाणे सुरू आहेत. येत्या महिन्यात आणखी काही शहरांचा समावेश करून विमानतळाचे जाळे विस्तारण्याची तयारी असल्याची माहिती देण्यात आली.

दिवसनिहाय आकडेवारीनुसार २५ डिसेंबरला ४,९२२, २६ डिसेंबरला ५,०२८, २७ डिसेंबरला ५,५४८, २८ डिसेंबरला ५,६१४ आणि २९ डिसेंबरला ४,९०९ प्रवाशांनी प्रवास केला.

# अंमली पदार्थांची विक्री करणारे आंतरराज्य रॅकेट उद्ध्वस्त

**पनवेल :** हेरॉईन आणि अफिम या अंमली पदार्थांची विक्री करणारे आंतरराज्य रॅकेट अंमली पदार्थ विरोधी कक्षाने उद्ध्वस्त केले असून आतापर्यंत या कारवाईत २५ आरोपींना अटक केली आहे.

पंजाब येथील राहणारे काही इसम नवी मुंबई येथे भाडे तत्वावर रूम घेवून स्थानिक लोकांना हेरॉईन व अफिम या अंमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली होती. त्यानुसार सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान जप्त अंमलीपदार्थ पंजाब येथून रेल्वे व रोड ट्रान्सपोर्टमार्गे नवी मुंबई येथे येत असल्याचे निष्पन्न झाले. अंमली पदार्थ विरोधी पथकाने रॅकेटचा भांडाफोड करत पंजाब राज्यातुन नवी मुंबई येथे येवून हेरॉईन विक्री करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करत २५ आरोपींना अटक केली. तर १० आरोपी हे फरार आहेत.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाने त्यांच्याकडून हेरॉईन (वजन ६८० ग्रॅम), अफिम (वजन १८२ ग्रॅम), कोडीयन सिरप बॉटल (१७ नग), ३० मोबाईल व ४ लाख ८० हजार रूपये रोख रक्कम असा एकूण ३ कोटी ३१ लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# नववर्ष स्वागतासाठी नवी मुंबई सज्ज : हॉटेल्स, संकुलांमध्ये विविध कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नववर्षाच्या स्वागतासाठी नवी मुंबई शहर सज्ज झाले आहे. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, पब, रिसॉर्ट्स तसेच गृहनिर्माण संकुलांमध्ये नववर्ष स्वागताच्या कार्यक्रमांची तयारी झाली आहे. शहरातील विविध ठिकाणी संगीत, नृत्य आणि थीम पार्ट्यांची धूम पाहायला मिळत आहे.



शहरातील विविध भागांतील परिसरात ३१ डिसेंबरसाठी अनेक कार्यक्रमांचे आगाऊ बुकिंग जवळपास पूर्ण झाले आहे. मर्यादित प्रवेश, वेळेचे नियोजन आणि सुरक्षिततेच्या अटींसह कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे अनेक हॉटेल्सच्या व्यवस्थापकांकडून सांगण्यात येत आहे. बहुतांश ठिकाणी डीजे संगीत, सौम्य प्रकाशयोजना आणि मध्यरात्री 'काऊंट डाऊन' कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यासोबतच खास आंतरराष्ट्रीय पदार्थांचा समावेश असलेला मेन्यूला पसंती मिळत आहे.

दरम्यान, निवडणुकांचे वातावरण लक्षात घेता अनेक राजकीय मंडळी आणि कार्यकर्त्यांनी यंदाचे नवीन वर्ष नवी मुंबईतच साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. जुन्या वर्षाला निरोप देत नव्या आशा-आकांक्षांसह ३१ डिसेंबर साजरा करण्यासाठी नवी मुंबईकर आता सज्ज झाले आहेत. नागरिकांनी नववर्ष आनंदात, पण शिस्तबद्ध आणि सुरक्षितपणे साजरे करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**पोलिसांकडून कडेकोट बंदोबस्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. प्रमुख चौकांवर नाकाबंदी, वाहन तपासणी केली जाणार असून, मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी उत्साहात पार्टी करताना नागरिकांनी नियम आणि शिस्तीचेही पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. शहरातील वाहतूक नियंत्रण आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रात्री उशिरापर्यंत पोलीस व वाहतूक पोलिसांची पथके तैनात असणार असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

**शाकाहारी पदार्थांना विशेष मागणी**

अनेक कुटुंबांनी यंदा घरगुती पातळीवरच नववर्ष साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शहरातील बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी गर्दी वाढली आहे. केक, मिठाई, सुकामेवा, बेकरी पदार्थ तसेच पार्टीसाठी लागणाऱ्या साहित्याला मोठी मागणी आहे. यंदा ३१ डिसेंबरला एकादशी आणि दुसऱ्या दिवशी गुरुवार असल्याने अनेक नागरिकांनी शाकाहारी खाद्यपदार्थांना प्राधान्य दिल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. खास तयार केलेल्या मेन्यूमध्येही शाकाहारी पदार्थांचा समावेश वाढला आहे.

# पत्रकार दिनानिमित्त विविध उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील चांभार्ली येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची रायगड जिल्ह्यातील पत्रकारांची आगामी वर्षातील उपक्रमांचे नियोजन करण्यासाठी कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या वतीने बैठक आयोजित करण्यात आली.



या बैठकीत महाड तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार संतोष कृष्णा घरटकर यांची रायगड जिल्हा कार्याध्यक्षपदी तर राहूल जाधव यांची जिल्हा कार्यकारीणी सदस्यपदी निवड करण्यात आली. याप्रसंगी महाडचे सुरेश शिंदे, कर्जतचे जयेश जाधव, खालापूरचे अर्जुन कदम, पेणचे विनायक पाटील, पनवेलचे सुनील पाटील, रोह्याचे किरण मोरे, अलिबागचे सुभाष म्हात्रे आदी उपस्थित होते.

याखेरिज रूपाली पवार यांची पोलादपूर सरचिटणीसपदी व अन्य तालुक्यातील पत्रकारांची तालुका कार्यकारिणीतील विविध पदांवर नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र प्रदान करण्यात आले. प्रारंभी कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर तसेच नवनियुक्त जिल्हा अध्यक्ष संतोष घरटकर यांचा सत्कार अनुक्रमे रायगड जिल्हाध्यक्ष राकेश खराडे व खालापूर शाखाध्यक्ष अर्जून कदम यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी महाड येथील तालुका कार्यकारिणीवर कोकण विभागीय अधिवेशनाची जबाबदारी देण्यात येणार असल्याने संतोष घरटकर यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती उपयुक्त ठरेल, असा विश्वास कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर यांनी व्यक्त केला.

या वेळी पत्रकारांनी आगामी वर्षातील विविध उपक्रमांच्या नियोजनाची माहिती उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिली.

# ज्ञानदीप विद्यालय करावेचे वार्षिक स्नेहसंमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

ज्ञानदीप सेवा मंडळ, करावे संचलित ज्ञानदीप सेवा मंडळाची प्राथमिक माध्यमिक व कनिष्ठ कनिष्ठ महाविद्यालय चे वार्षिक स्नेहसंमेलन दोन दिवस २९ व ३० डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात झाला.



शाळेतील शिशु वर्गापासून बारावीपर्यंतच्या मराठी व इंग्रजी माध्यमाचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित कार्यक्रमास पालकांनी मोठी गर्दी केली होती दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील वर्धापन दिन व स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी धमाल केली.

वर्षभर साजरा होणारे कार्यक्रम, उपक्रम, समारंभ व स्पर्धांसाठी उपस्थित पाहुण्यांनी विद्यालयास पाठवलेल्या शुभेच्छा संदेशांचे व्हिडिओ क्लिप दाखवल्या गेल्या. विद्यालयाने वर्षभरात मिळवलेल्या यशाचे मानकरी असलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला शाळेतील विद्यार्थ्यांनी आंतरशालेय दिंडी स्पर्धा, लंगडी स्पर्धा, दुर्ग बांधणी तसेच इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांची क्रिकेट टिम विविध सामने जिंकून अनेक पारितोषिक पटकावत आहेत. शाळेतील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त रत्नाकर तांडेल, हरेश तांडेल, विलास जाधव, सुरेश चव्हाण आणि दर्शना भोईर यांचा संस्थेमार्फत गौरव करण्यात आला.

शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका शोभना पाटील, विकास वाणी, दयाराम शिंदे, प्रकाश पाटील, विजय ठाकूर यांचादेखील मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शाळेस सहकार्य करणारे डॉ.कविता वैद्य, अनिल मुनघाटे, संदीप म्हात्रे, सतीश गांगुर्डे, रेश्मा पट्टम, जयश्री सानप, मीरायांचा सन्मान संस्थेने केला.

कार्यक्रमावेळी प्रमुख पाहुणे मोहिनी लोखंडे - वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक विभाग सीवूड उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे अध्यक्ष रवींद्र नाईक, उपाध्यक्ष विजय तांडेल, सचिव अरविंद नाईक, सहसचिव प्रसाद तांडेल आणि कार्यकारणी सदस्य मधुकर पाटील, पंडित तांडेल, हरिश्चंद्र तांडेल, विलास तांडेल, सुरेखा तांडेल उपस्थित होत्या. सूत्रसंचालन अक्षरा नागरे, यश सरवदे, श्रद्धा माने, पूजा गुप्ता, हरेश तांडेल, मनाली माळी यांनी केले.

# वाशी येथे कविता डॉट कॉमचे मासिक काव्य संमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

शिव तुतारी प्रतिष्ठान संचलित, कविता डॉट कॉमच्या मासिक काव्य संमेलनात, मराठा भवन, वाशी येथे रसिकांच्या उदंड प्रतिसादात अनेक कवींनी आपल्या कविता सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे अध्यक्ष कवी सुनील अढाऊकर हे होते. नवी मुंबई आणि मुंबई परिसरातून आलेल्या एकूण ५० पेक्षा अधिक रसिकांसमोर ३० कवींनी आपल्या कविता सादर केल्या.कविता सादर करत असताना सामाजिक आणि नैतिक मूल्य संवर्धन कसे होईल, असा संदेश देणाऱ्या कविता सर्व कवींनी सादर केल्या.



मान्यवर कवीमध्ये ज्येष्ठ कवी पांडुरंग म्हात्रे , कृष्णत संकपाळ, दिलीप गोंधळी, शिवाजी भागवत, स्वाती शिवशरण, उमेश जाधव, संगीता काळभोर, मानसी राऊत, अनुकूल माळी, रेश्मा राऊत, स्मिता वाजेकर, निर्मला भागवत, प्रसाद माळी आणि इतर मान्यवर कवी उपस्थित होते.

कार्यक्रमावेळी प्रा.नाना पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना, कविता डॉट कॉमकडून कवींना व्यासपीठ उपलब्ध होत असल्याने ही एक मोठी सांस्कृतिक चळवळ होत असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील अढाऊकर यांनी आपल्या समृद्ध अशा काव्य प्रवासाचा अनुभव उलगडत, आपले गुरू ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांना स्मरण करत आपला काव्य प्रवास व्यक्त केला. काव्य संमेलनात अहिराणी, आंग्री, विदर्भातील भाषांचा संगम बघून कवी अनंत राऊत ते कवी प्रशांत मोरे यांच्यापर्यंत कविता झाल्याने आनंद द्विगुणित झाल्याचे नमूद केले.

नव कवींना मार्गदर्शन करताना, त्यांनी कविता ही समाज, राष्ट्र आणि संस्कृती पुरक असावी असे नमूद करतांना, कवींनी आधी आपल्या काव्यावर प्रेम करतानाच, इतर भरपूर काव्य वाचले आणि काव्य संग्रह खरेदी केले पाहिजे, असे प्रतिपादन केले. दैनिक नवे शहर पुरस्कृत, प्रवास सुजनाचा या सदरातील प्रसिद्ध झालेल्या कविता, कवींना आठवण भेट म्हणून भेट देण्यात आल्या. ती चोख जबाबदारी विलास समेळ यांनी पार पाडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता गोळे तर आभार गजानन साठे यांनी मानले. प्रा.रवींद्र पाटील यांनी कविता डॉट कॉम परिवारकडून केलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. कार्यक्रम करण्यासाठी नारायण लांडगे पाटील, ज्योती माळी, शंकर गोपाळे, मनिषा पाटील यांनी जबाबदारी पार पाडली.

# एपीएमसी बाजारात देवगड केसर आंबा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आंबा खवय्यांसाठी आनंदाची बातमी असून, मुंबई एपीएमसी फळ बाजारात केशर आंब्याची हंगामातील पहिली पेटी दाखल झाली आहे. देवगड तालुक्यातील वाघोटण गावातील जावेद मुल्ला या बागायतदाराच्या बागेतील केशर आंबा बाजारात आल्याने व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



मुंबई एपीएमसीतील आंबा व्यापारी संजय पानसरे यांच्या गाळ्यावर मंगळवारी केशर आंब्याची पेटी दाखल झाली. परंपरेनुसार व्यापाऱ्यांकडून आंब्याच्या पहिल्या पेटीची पूजा करून विक्रीस प्रारंभ करण्यात आला. सध्या चार डझनाची एक पेटी बाजारात उपलब्ध असून, येत्या काही दिवसांत २०० ते २५० पेटी केशर आंबा बाजारात पाठवण्यात येणार असल्याची माहिती संबंधित शेतकऱ्याने दिली आहे. प्रारंभी आवक मर्यादित असल्याने सध्या स्थानिक बाजारातच विक्री केली जात असून, आवक वाढल्यानंतर निर्यातीला गती दिली जाणार असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

गेल्या पाच ते दहा वर्षांत कोकणासह पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही केशर आंब्याची लागवड वाढली आहे. चव, टिकाऊपणा आणि रंगामुळे देशांतर्गत बाजारासह परदेशातूनही केशर आंब्याला चांगली मागणी असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

सध्या केशर आंब्याला डझनामागे साधारण १००० ते १,२०० रुपयांच्या आसपास भाव मिळत आहे. आवक वाढल्यास दरात काहीशी नरमाई येण्याची शक्यता आहे. तरी, गुजरातचा केशर आंबा बाजारात येण्यापूर्वी महाराष्ट्रातील केशर आंबा बाजारात आल्याने आंबा प्रेमींसाठी विशेष पर्वणी ठरणार असल्याचे पानसरे यांनी सांगितले.

> **कोकणातील केशर आंबा लवकर बाजारात आल्याने आंबा खवय्यांना त्याचा आस्वाद लवकर घेता येणार आहे. यंदा १५-२० मार्च पर्यंत आंब्याचा हंगाम जोर धरेल. त्यामुळे यंदाच्या हंगामात आंबा प्रेमींना कोकणातील हापूससह केशर आंबाही खाता येईल.**
> **-संजय पानसरे,** आंबा व्यापारी

# नवीन वर्षाचे स्वागत ; मुरूड समुद्रकिनाऱ्यांवर तुफान गर्दी

## पोलिसांची करडी नजर



**मुरूड : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देत नवीन नववर्षाच्या स्वागतासाठी मुरूड पर्यटन क्षेत्रावर मोठ्या संख्येने पर्यटकांची गर्दी केली होती. नवीन वर्षे सुरू होण्यासाठी अवघे तास शिल्लक राहिले आहेत. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक जण विविध ठिकाणी फिरायला जात असतात.

याच पार्श्वभूमीवर मुरूडला पर्यटकांनी चांगली पसंती दिली आसुन पर्यटकांनी समुद्रकिनारे बहरले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांची करडी नजर असणार आहे. या करिता पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ३ पोलीस अधिकारी ७० पोलीस कर्मचारी व ३० होमगार्ड यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला असून

नविन वर्षाच्या स्वागतासाठी मुरूड समुद्रकिनारावरील हॉटेल, लॉजिंग, रेस्टॉरंट विद्युत रोषणाईने सजल्या आहेत. घोडागाडी, ऊंट स्वारी,बाईक स्वार , सायकलवर स्वारी करणे पर्यटकांनी पसंती केली आहे.सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नव वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक मुरूडला मोठ्या प्रमाणात येत आहे. येणाऱ्या पर्यटकांनी पार्किंग मध्ये आपल्या गाड्या उभ्या करा. जेणेकरून कोणाला त्रास होणार नाही. पर्यटकांनी समुद्रात उतरताना समुद्राची माहिती घ्या दारु पिऊन खोल समुद्रात जाऊ नये धोकादायक भागात पोहण्याचा टाळा पोहताना सेफ्टी जॅक्टचा वापर करा असे आवाहन पर्यटकांना पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी केले आहे. रस्तावर वाहतुक व्यवस्था ही विस्कळीत होऊन नये त्याकरिता ट्राफीक पोलिसांची नेमणूक केली आहे.

समुद्रकिनारा, सुर्वे नाका, परेश नाका, दस्तुरीनाका, शिघ्रे चेक पोस्ट, ऐतिहासिक जंजिरा किल्ला या ठिकाणी पोलिसाचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सध्या आमच्याकडे ३ पोलिस अधिकारी ७० पोलिस कर्मचारी, ३० होमगार्डची नेमणूक केली आहे. पर्यटकांची संख्या जर वाढली तर आजुन पोलिस बंदोबस्त वाढविण्यात येईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी दिली.

# खोपोलीत कचऱ्याचा ढीग, अपुरा पाणीपुरवठा, रस्ते खड्डेमय

## तरीही आंतरराष्ट्रीय आयएसओ प्रमाणपत्र

**खालापूर : प्रतिनिधी**

मागील ३ वर्षे खोपोलीत प्रशासन राजवट असून खोपोली शहर अनेक समस्यांच्या विळख्यात सापडले आहे तरीही खोपोली नगरपालीकेला आयएसओ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

मूलभूत, सेवा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व वितरण, रस्ते देखभाल, सार्वजनिक, प्रशासन तसेच परवाने, प्रमाणपत्रे जारी करणे या सेवांच्या आधारे नगरपालीका कार्याचे मूल्यमापन करण्यात आले. नागरिक केंद्रित सेवा, प्रशासनाच्या कार्यपद्धतीत सुधारणा, आधुनिक तंत्रज्ञान आणि पारदर्शकता या चतुः सूत्रीच्या आधारे खोपोली नगर परिषद लौकिकपात्र ठरल्याचा दावा फुसका ठरला असून फक्त कागदपत्रे रंगवून नगरपालीका प्रशासनाने आंतरराष्ट्रीय दर्जा व्यवस्थापन मानांकन (आयएसओ ९००१:२०२५) आरओएचएस सर्टिफिकेट घेतले असल्याची चर्चा आहे.

प्रमाणपत्र मुख्याधिकारी तथा प्रशासक पंकज पाटील यांच्या नियोजनबद्ध कामगिरीमुळे मानांकन मिळवले असल्याचा दावा केला जात आहे. प्रमाणपत्राची वैधता ४ डिसेंबर २०२८ पर्यंत आहे. शहरातील १०० कोटी रुपयांची कोमात गेलेली भुयारी गटार योजना , मागील २ वर्षे पासून रखडली आहे, या कामासाठी खोदलेले रस्ते अपघातांना निमंत्रण ठरत आहेत. भानवज काटरंग तसेच नवी खोपोली म्हणून उदयास येत असलेले लौजी चिंचवली, शेडवली, डिपी रोड परिसरातील रस्ते खड्डेमय झाले आहेत मागील ३ वर्षे या कडे प्रशासनाने लक्ष दिले नाही, तर ४६ कोटी रुपये खर्चाची वाढीव पाणी पुरवठा योजना अनियमित तसेच असमतोल पाणी पुरवठा, पाणी गळतीने व निकृष्ट कामामुळे चर्चेत आहे.

रखडलेली आरोग्य सुविधा व रेंगाळलेले रुग्णालयाचे काम, १८ कोटी रुपयांचा निधी शाहू महाराज सभागृह / नाट्यगृहावर खर्च पडले असले तरी या सभागृहाचा ५ वर्षे पडदा उघडलाच नाही. अशा अनेक समस्यांच्या विळख्यात खोपोली शहर / नगरपालिका असताना नगरपालीकेला आय. एस. ओ. प्रमाणपत्र कोणत्या आधारावर मिळाले अशी नागरीकांत चर्चा आहे.

दरम्यान नवनिर्वाचित अपक्ष नगरसेवक राहुल गायकवाड यांनी बुधवारी सकाळी खोपोली शहरातील विविध प्रभागात फेरफटका मारला. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसून आले. नगरसेवक गायकवाड यांनी तात्काळ भागातील आरोग्य निरीक्षक सोळंकी यांना बोलून हा कचरा दुपारपर्यंत उचलला गेला पाहिजे असे सक्त आदेश दिले.

त्याचप्रमाणे ठेकेदार यांनाही फोनवर निर्देश दिले. संबंधित ठिकाणी फलक लावण्यात येऊन कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे अपक्ष नगरसेवक राहुल यशवंत गायकवाड यांनी सांगितले.



# रोहा तालुक्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणांसाठी ३ जानेवारी रोजी विशेष मोहीम

**रोहे : प्रतिनिधी**

जिल्ह्यात पावसाळयामध्ये माहे जून ते ऑक्टोबर २०२५ या महिन्यांत सतत पाऊस असल्या कारणाने मोजणी काम होऊ शकलेले नाही. त्यामुळे उप अधीक्षक भूमि अभिलेख रोहा कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणात मोजणी प्रकरणे प्रलंबित राहिलेली आहेत. या मोजणी प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे सुहास दिवसे यांच्या निर्देशानुसार व उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई अनिल माने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड यांच्याडून या प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्याकामी विशेष मोहीम राबविण्यात येत असून त्यामध्ये १२६ प्रकरणे ३ जानेवारी २०२६ या एकाच दिवशी मोजणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व प्रकरणांत मोजणीच्या नोटीस सर्व संबंधितांना पाठविण्यात आल्या असून संबंधित अर्जदार व हितसंबंधित यांनी या दिवशी उपस्थित राहून आपल्या जमिनींची मोजणी करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड सुनिल इंदलकर यांनी केले आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख रोहा कार्यालयाकडे माहे नोव्हेंबर २०२५अखेर एकूण ३८९ मोजणी प्रकरणे शिल्लक होती. त्यातील २२६ मोजणी प्रकरणे मुदतबाह्य झालेली असून तीन महापेक्षा जास्त कालावधीवर प्रलंबित आहेत. पैकी ३६ प्रकरणांत मोजणी पूर्ण झालेली असून ६४ प्रकरणांत माहे डिसेंबर २०२५ मध्ये मोजणी तारखा लावण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत १२६ मुदतबाह्य मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत.

या विशेष मोहिमेमुळे तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर प्रकरणांचा निपटारा होणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. विशेष मोहीम अंतर्गत ३ जानेवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील अन्य तालुक्यातील कर्मचारी यांच्या सेवा वापरून एकाच दिवशी रोहा तालुक्यातील १२६ मोजणी प्रकरणांची मोजणी करण्यात येणार आहे.

# सुकेळी आदिवासीवाडी येथे विश्वशांती हरिनाम सप्ताह

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जवळच असलेल्या सुकेळी आदिवासीवाडी येथे शुक्रवार (दि.२) व शनिवार (दि. ३) जानेवारी २०२६ रोजी अखंड विश्र्वशांती हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. या दैनंदिन कार्यक्रमांमध्ये काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरीपाठ, किर्तन असे कार्यक्रम होणार आहेत.

या कार्यक्रमाची सुरुवात गुरुवर्य ह. भ. प. नारायणदादा महाराज अलिबागकर (वाजे) मठाधिपती पंढरपूर यांच्या हस्ते घटस्थापना होईल. त्याचप्रमाणे शुक्रवार (दि. २) रोजी बारकु महाराज वाघमारे (सुकेळी) यांचे प्रवचन तसेच भरत महाराज अलिबागक (वाजे) पंढरपूर यांची किर्तनसेवा होईल. शनिवार (दि.३) रोजी सकाळी ९.३० ते ११.३० वाजता गुरुवर्य ह.भ.प. नारायणदादा अलिबागकर वाजे महाराज (मठाधिपती पंढरपूर) यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर ग्रामस्थ मंडळ सुकेळी आदिवासीवाडी यांच्यातर्फे आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसाद देऊन या भव्यदिव्य कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ मंडळ, तरुण मंडळ, महिला मंडळ सुकेळी आदिवासीवाडी हे मेहनत घेत आहेत.

# मध्य रेल्वेकरीता वर्ष २०२५ : प्रवासी-केंद्रित वाढ आणि हरित उपक्रमांचे वर्ष

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने २०२५ मध्ये विद्युतिकरणाच्या १०० वर्षांचा गौरवपूर्ण उत्सव साजरा केला. १९२५ मध्ये हार्बर मार्गावर व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) ते कुर्ला दरम्यान धावलेल्या पहिल्या विद्युत रेल्वेच्या ऐतिहासिक प्रवासाचे स्मरण यानिमित्ताने करण्यात आले. हा महत्त्वपूर्ण टप्पा प्रगती, नवोन्मेष आणि राष्ट्रसेवेच्या शतकभराच्या प्रवासाचे प्रतीक आहे.

प्रवासी सेवा, सुरक्षिततेत वाढ, पायाभूत सुविधांचा विकास, डिजिटायझेशन, हरित ऊर्जेचा अवलंब, स्थानकांचे पुनर्विकास तसेच नाविन्यपूर्ण तांत्रिक उपाययोजना अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय यशांमुळे २०२५ हे वर्ष मध्य रेल्वेसाठी महत्त्वपूर्ण वर्ष ठरले. या सर्व उपक्रमांद्वारे प्रवाशांचा प्रवासानुभव अधिक सुखकर करण्याची आणि कार्यक्षमतेत उत्कृष्टता साध्य करण्याची मध्य रेल्वेची दृढ बांधिलकी अधोरेखित झाली आहे.

२०२५ मध्ये मध्य रेल्वेने प्रवासी तसेच मालवाहतूक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. संपूर्ण नेटवर्कवरून १,५०० दशलक्षाहून अधिक प्रवाशांची वाहतूक करण्यात आली असून, प्रवासी, कोचिंग व इतर उत्पन्नासह एकूण रु१६,११० कोटींपेक्षा अधिक महसूल प्राप्त झाला. मालवाहतूक क्षेत्रातील कामगिरीही भक्कम राहिली असून, वर्षभरात ७३.३७ दशलक्ष टन मालाची वाहतूक नोंदवण्यात आली.

प्रवाशांच्या सोयीसुविधांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. २०२५ दरम्यान विविध स्थानकांवर २१ एस्कलेटर आणि २३ लिफ्ट कार्यान्वित करण्यात आल्या. उपनगरीय संपर्क अधिक सक्षम करण्यासाठी नेरुळ/बेलापूर ते उरण दरम्यान १० अतिरिक्त उपनगरीय सेवा सुरू करण्यात आल्या. मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे मोबाइल यूटीएस सहाय्यकांची सुविधा सुरू केली असून, हातातील उपकरणे व पोर्टेबल प्रिंटरच्या माध्यमातून तात्काळ तिकीट उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे रोख तसेच डिजिटल दोन्ही प्रकारच्या पेमेंटची सोय उपलब्ध झाली असून, तिकीट रांगांमध्ये लक्षणीय घट होऊन प्रवास अधिक सुलभ झाला आहे.

तिकीट तपासणी मोहिमांदरम्यान अनधिकृत अथवा विनातिकीट प्रवासाच्या ३७.५५ लाख प्रकरणांचा शोध घेतला असून, यामध्ये रु२१६.६२ कोटींचा दंड वसूल करण्यात आला. यामुळे भाडे शिस्तीचे पालन अधिक बळकट झाले असून प्रवाशांमध्ये शिस्तबद्ध प्रवासाला प्रोत्साहन मिळाले आहे.

नेरुळ/बेलापूर- उरण मार्गावर तरघर आणि गव्हाण ही दोन नवीन उपनगरीय स्थानके कार्यान्वित करण्यात आली असून, या मार्गावर १० अतिरिक्त उपनगरीय सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे वाढत्या निवासी व औद्योगिक परिसरांना अधिक सुलभ प्रवेश मिळाला आहे. यासोबतच नवनिर्मित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संपर्कही अधिक मजबूत झाला आहे.

अनेक नवीन रेल्वे सेवा सुरू करण्यात आल्या यामध्ये पुणे अजनी वंदे भारत एक्सप्रेस,नांदेड छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत एक्सप्रेस,लोकमान्य टिळक टर्मिनस सहरसा अमृत भारत एक्सप्रेस, जोधपूर पुणे एक्सप्रेस, हडपसर रीवा एक्सप्रेस, अहिल्यानगर- बीड डेमू यांचा समावेश आहे.

हंगामी व सणासुदीच्या प्रवासी मागणीची पूर्तता करण्यासाठी मध्य रेल्वेने वर्षभरात ३,०९७ हून अधिक विशेष रेल्वे सेवा चालविल्या. यामध्ये कुंभमेळा, दिवाळी, छठ पूजा, उन्हाळी सुट्ट्या, गणपती उत्सव, होळी, आषाढी वारी तसेच महापरिनिर्वाण दिनासाठीच्या सेवांचा समावेश होता.

महाकुंभ २०२५ दरम्यान, मुंबईहून सहा विशेष गाड्यांसह एकूण ८२३ रेल्वे सेवा चालवून लाखो भाविकांसाठी सुलभ व आरामदायी प्रवासाची व्यवस्था करण्यात आली. याशिवाय प्रवाशांच्या सोयीसाठी विविध गाड्यांना ५२ नवीन थांबेही देण्यात आले. २०२५ मध्ये पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे टप्पे गाठण्यात आले. मध्य रेल्वेने आव्हानात्मक ९.४५ किमी लांबीचा शिंदवणे- अंबाळे घाट विभाग कार्यान्वित करून २८१ किमी लांबीच्या पुणे- मिरज दुहेरीकरण प्रकल्पाची पूर्तता केली, ज्यामुळे या मार्गावरील वाहनक्षमता वाढली आहे. अमळनेर- बीड रेल्वे मार्गही कार्यान्वित करण्यात आला असून, यामुळे यापूर्वी रेल्वेसेवेपासून वंचित असलेल्या भागांना ऐतिहासिक रेल्वे संपर्क मिळाला आहे. यासोबतच अहिल्यानगर आणि बीड दरम्यान अखंड व सुलभ रेल्वे संपर्कही प्रस्थापित झाला आहे.

दौंड- सोलापूर- वाडी विभागाचे उन्नतीकरण करण्यात आले असून, ३४१.८० किमी लांबीच्या मार्गावर कमाल अनुमत वेग ११० किमी प्रतितासावरून १३० किमी प्रतितास इतका वाढवण्यात आला आहे. याचा लाभ ४४ जोड्या गाड्यांना होत आहे. नूतनीकरण करण्यात आलेले कर्जत यार्ड तसेच नवीन रूट रिले इंटरलॉकिंग प्रणालीमुळे कार्यसुरक्षा आणि विश्वासार्हता अधिक बळकट झाली आहे.

तसेच नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी सुमारे रु१५०० कोटींच्या तयारीच्या कामांनाही सुरुवात करण्यात आली आहे. मध्य रेल्वेने रेल्वे सुरक्षिततेच्या क्षेत्रात एक मोठा टप्पा गाठला, जेव्हा सर्व पाच विभागांमध्ये कवच लोको चाचण्या पूर्ण केल्या आणि सहा महिन्यांत हे यश गाठणारी पहिले क्षेत्रिय रेल्वे ठरली. या प्रणालीला मध्य रेल्वे नेटवर्कवर राबविण्याची योजना आहे, ज्यासाठी व्यापक कर्मचारी प्रशिक्षण देखील दिले जाणार आहे.

यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी अनुकूल ईएमयू डब्याची सुरुवात, ऑप्टिकल ग्राउंड वायर कम्युनिकेशन प्रणाली, आणि पावसाळ्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी व प्रवासी डब्यांमधील पाण्याच्या पातळीचे रिअल-टाइम निरीक्षण करण्यासाठी पुरस्कार-विजेत्या स्वदेशी उपायांचा समावेश होता. मध्य रेल्वेने ओपन ॲक्सेस वीज खरेदीचा अवलंब करून शाश्वततेच्या क्षेत्रात आघाडीची भूमिका बजावली आहे. यामुळे खर्च-कुशलता, विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक वीज पुरवठा सुनिश्चित होतो. हा उपक्रम भारतीय रेल्वेच्या २०३० पर्यंत शुद्ध शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या उद्दिष्टाला पाठबळ देतो.

> **या वर्षात अनेक ऐतिहासिक क्षण**
>
> **ज्यात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सामूहिक गायनाने साजरा केलेला 'वंदे मातरम'चा १५० वा वर्धापनदिन; वंदे भारत आणि मालगाड्यांचे संपूर्ण महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते संचालन करून साजरा केलेला आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२५; आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित वारसा प्रदर्शनाचा समावेश असलेला जागतिक वारसा दिन यांचा समावेश आहे.१५ स्थानकांवर स्टेशन महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे .**

# माणगावचे विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे यांना कुलाबा जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**माणगाव; प्रतिनिधी**

माणगाव येथील अष्टपैलू व्यक्तिमत्व तथा शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक कमाविलेल्या विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ररमेश ढेपे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल स्व. माजी आ.मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग,भाई जगताप मित्रमंडळ रायगड,अँड.उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण शनिवार दि.३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी



सायंकाळी ५:३० वाजता मु.सातिर्जे,ता.अलिबाग या ठिकाणी होणाऱ्या भव्य दिव्य अशा कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंती निमित्त सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा,वैदयकिय,सांस्कृतिक तसेच पत्रकारिता या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा दरवर्षी माजी आ.मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग,भाई जगताप मित्रमंडळ रायगड,अँड.उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येतो.

त्यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी प्राचार्य विवेक ढेपे यांचे पुष्पगुच्छ देऊन खास अभिनंदन केले.

# राजिप माध्यमिक शिक्षण विभागाचे लेखाधिकारीपदी समीर अधिकारी

**मुरुड :** शिक्षण विभाग माध्यमिक लेखाधिकारी म्हणून समीर सुरेश अधिकारी हे रुजू झाले आहेत.मूळचे चोल आग्राव येथील रहिवाशी असणारे अधिकारी हे या पूर्वी रायगड जिल्हा परिषद कृषी विभागात सहाय्यक लेखाधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केले आहे.




त्यांना पदोन्नती मिळून ते आता माध्यमिक शिक्षण विभागाचे लेखाधिकारी म्हणून रुजू झाले आहेत.त्यांनी आपला पदभार नुकताच स्वीकारला आहे. अत्यंत शांत स्वभाव व सर्वांशी मिळून मिसळून व आपले पणाची वागणूक देणारे अधिकारी हे सर्वत्र सुपरिचित आहेत.त्यांनी आपला पदभार स्वीकारताच अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# लोकप्रिय कीर्तनकार शिवलीला पाटील यांचे ६ जानेवारीला वडवळ येथे किर्तन

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद,अलिबाग यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत विशेष जनजागृती कार्यक्रम म्हणून महाराष्ट्रातील लोकप्रिय किर्तनकार शिवलीलाताई पाटील यांचे किर्तन खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत वडवळ यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आले आहे.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, ज्याचा उद्देश ग्रामपंचायतींना सक्षम करणे, पायाभूत सुविधा सुधारणे, पारदर्शकता आणणे आणि ग्रामीण भागात शाश्वत विकास घडवून आणणे आहे, ज्यात आरोग्य, शिक्षण, उपजीविका आणि सामाजिक न्याय यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून लोकसहभागातून गावांचा सर्वांगीण विकास साधला जातो. या अंतर्गत मालमत्ता कर सवलत, डिजिटल सेवा आणि हर घर शोषखड्डे सारखे उपक्रम राबवले जातात, ज्यामुळे ग्रामीण प्रशासनात सुधारणा होत आहे.

ग्रामपंचायतींना अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक नवणे. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास करून स्वच्छता करणे, मुबलक पाणी पुरवठा, या विकासाच्या प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे हा आहे.गावांमध्ये आत्मनिर्भरता आणि विकासाची भावना निर्माण करणे. प्रशासनाचे डिजिटायझेशन करून ग्राम पंचायत वेबसाइट्स तयार करणे. सांडपाणी नाविन्य पूर्ण उपक्रम राबविण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देणे, असा हा उपक्रम राज्यात राबविण्यात येत आहे.

## एमसीए वूमेन्स क्रिकेट स्पर्धेत

# रायगडच्या संघाचा सलग दुसरा विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलींच्या एकदिवसीय ५० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा सध्या रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील विविध मैदानांवर उत्साहाच्या वातावरणात सुरू आहे.



पेण येथे छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर रायगडच्या मुलींच्या संघाचा सामना सिंधुदुर्ग जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींच्या संघाबरोबर खेळला गेल्या, अतिशय अटीतटीच्या झालेल्या सामन्यात रायगडच्या संघानी सिंधुदुर्गच्या संघावर आठ धावांनी विजय मिळवत विजयाचा प्रवास सुरू ठेवला आहे. रायगडच्या मुलींच्या संघानी साखळी फेरीत सलग दुसरा विजय मिळवला असून संघाचे मनोबल उंचावले आहे. प्रथम फलंदाजी करताना रायगडच्या संघानी २८.३ षटकांमध्ये सर्व गडी बाद १२३ धावाच धावफळकावर नोंदवल्या त्यामध्ये रायगडच्या संघाची सलामीवीर तंत्रशुद्ध तडाखेबाज फलंदाज ब्रतती राय हिने चौफेर टोलेबाजी करत ५३ धावांची दमदार खेळी केली तिला काव्या धावडे हिने बहुमूल्य २५ धावा करून साथ दिली.

सिंधुदुर्ग कडून समृद्धी जोशीलकर हिने सर्वाधिक ५ तर श्रेया पाटील व कृत्तिका सोने ह्यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले. सिंधुदुर्गच्या संघाला जिंकण्यासाठी ५० षटकांमध्ये अवघ्या १२४ धावांची गरज असताना संघाचा संपूर्ण डाव ११५ धावसंखेवर गडगडला,रायगडच्या भेदक गोलंदाजी समोर सिंधुदुर्गच्या संघानी अक्षरशः नांगी टाकली समृद्धी कांबळे हिने ४ तर समिधा तांडेल हिने २ फलंदाज बाद करत संघाला अटीतटीच्या झालेल्या सामन्यात विजय मिळवून दिला, रायगडच्या संघाने अप्रतिम क्षेत्ररक्षण करत तीन फलंदाज धावबाद केले,परिणामी रायगडच्या मुलींच्या संघाने सामना ८ धावांनी जिंकला.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक आदींनी संघाचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्राचा तारणहार! ऋतुराजचे विजय हजारे ट्रॉफीत शानदार शतक

**मुंबई : प्रतिनिधी**

विजय हजारे ट्रॉफीच्या गट टप्प्यात महाराष्ट्र आणि उत्तराखंड यांच्यात सामना खेळवला जात आहे. या सामन्यात महाराष्ट्र संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने संघासाठ शतकी खेळी केली. या खेळीसह तो संघासाठी तारणहार ठरला. ऋतुराज गायकवाड यंदा उत्कृष्ट फॉर्मात असून त्याने संधी मिळालेल्या सर्व सामन्यांमध्ये वादळी खेळी केल्या.



ऋतुराज गायकवाडने १०५ चेंडूत १० चौकार व एका षटकारासह १०१ धाव करत संघाचा डाव सावरला. महाराष्ट्र संघाची सुरूवात खूप खराब झाली. संघाने ५० धावांत ३ विकेट्स गमावल्यानंतर ऋतुराज गायकवाड फलंदाजीला उतरला आणि त्याने शतक झळकावत संघाला २०० धावांच्या पलीकडे नेलं.

उत्तराखंड संघाने नाणेफेक जिंकत महाराष्ट्र संघाला फलंदाजीसाठी पाचारण केलं. पण संघाची सुरूवात फार खराब झाली आणि ५० धावांवर ३ विकेट्स गमावले. यानंतर ऋतुराज गायकवाड फलंदाजीला उतरला आणि त्याने राहुल त्रिपाठी व सत्यजीत बचाव याच्या साथीने संघाला मजबूत स्थिती नेलं. राहुल व ऋतुराजने अर्धशतकी तर ऋतुराज-सत्यजीतने शतकी भागीदारी करत महाराष्ट्र संघ ३०० धावांच्या पलीकडे गेला.

ऋतुराज गायकवाजने ११३ चेंडूत १२ चौकार व ३ षटकारांच्या मदतीने १२४ धावांची खेळी केली. त्याशिवाय राहुल त्रिपाठीने ३३ धावा, सत्यजीत बचावने ५६ धावांची तर रामकृष्ण घोष याने ४७ धावांची खेळी केली. यासह महाराष्ट्रने ५० षटकांत ७ विकेट्स गावत ३३१ धावा केल्या.

## अर्जुन एरिगेसी, कोनेरू हंपीला ऐतिहासिक 'कांस्य'

**दोहा** : 'फिडे' जागतिक रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या अर्जुन एरिगेसी आणि कोनेरू हंपी यांनी अनुक्रमे पुरुष आणि महिला गटात ऐतिहासिक कांस्यपदकावर आपली मोहोर उमटवली. या स्पर्धेत दिग्गज खेळाडू मॅग्नस कार्लसन आणि अलेक्झांड्रा गोर्याचकिना यांनी या स्पर्धेत जेतेपदावर नाव कोरले.



१३ फेऱ्यांच्या अखेरीस व्लादिस्लाव आर्टेमिएव्ह, अर्जुन एरिगेसी, हॅन्स मोके निमन आणि लेनियर डोमिन्गेझ पेरेझ या चार खेळाडूंचे प्रत्येकी ९.५ गुण झाल्याने दुसऱ्या स्थानासाठी चुरस निर्माण झाली होती. अर्जुनने अखेरच्या फेरीत अलेक्झांडर शिमानोव्हवर महत्त्वपूर्ण विजय मिळवत ९.५ गुणांचा टप्पा गाठला. टाय-ब्रेकर नियमानुसार १०५.५ गुणांसह आर्टेमिएव्हने दुसरे, तर ९८ गुणांसह अर्जुनने तिसरे स्थान पटकावून कांस्यपदक निश्चित केले. महिला गटात भारताची अनुभवी खेळाडू कोनेरू हंपी, अलेक्झांड्रा गोर्याचकिना आणि चीनची झू जिनर या तिघींचे ११ फेऱ्यांअखेर ८.५ गुण झाले होते. टाय-ब्रेकरनुसार झू प्रथम, गोर्याचकिना द्वितीय, तर हंपी तृतीय स्थानावर राहिली. त्यानंतर झू जिनरचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले.

## मलिंगाची गोलंदाजी सल्लागार प्रशिक्षकपदी नेमणूक

**कोलंबो : वृत्तसंस्था**

येत्या काही दिवसात आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेआधी श्रीलंका क्रिकेट बोर्डने मोठी घोषणा केली आहे. श्रीलंकेचा दिग्गज गोलंदाज लसिथ मलिंगाची कन्सल्टंट-फास्ट बॉलिंग कोच (वेगवान गोलंदाजी सल्लागार प्रशिक्षक) नेमणूक करण्यात आली आहे.

आश्चर्यचकीत करणारी बाब अशी की हा कालावधी केवळ ४० दिवसांसाठी असणार आहे. टी-२० वर्ल्डकप स्पर्धा सुरू होण्याआधीच त्याला या पदावरून काढले जाऊ शकते, कारण हा करार अवघ्या काही दिवसांसाठीच असणार आहे.

श्रीलंका क्रिकेट बोर्डने जाहीर केलेल्या करारानुसार मलिंगा १५ डिसेंबर ते २५ जानेवारीपर्यंत या पदावर राहणार आहे. त्याचा हा कार्यकाळ सुरू होऊन १५ दिवस उलटले आहेत, तर अजून २६ दिवस तो या पदावर कायम राहणार आहे. जर त्याने ही जबाबदारी योग्यरित्या पार पाडली, तर आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठीही त्याच्याकडे ही जबाबदारी सोपवली जाऊ शकते.

# टीम इंडियाने श्रीलंकेचा धुव्वा उडवला

## वर्ल्डकपपूर्वी ५-० ने व्हाईटवॉश देत निर्विवाद वर्चस्व

**तिरुअनंतपुरम : वृत्तसंस्था**

तिरुअनंतपुरम येथील ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या शेवटच्या टी-२० सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाने श्रीलंकेचा १५ धावांनी पराभव केला. या विजयासह, भारतीय संघाने मालिका ५-० अशी जिंकली.



श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाने श्रीलंकेसमोर १७६ धावांचे लक्ष्य ठेवले. हरमनप्रीत कौरने शानदार अर्धशतक झळकावले. प्रत्युत्तरात श्रीलंकेला फक्त १६० धावाच करता आल्या. भारतात पुढील वर्षी, २०२६ मध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकात खेळला आहे. त्या तयारीसाठी ही मालिका महत्त्वाची मानली जात होती.

१७६ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना, श्रीलंकेची सुरुवात खराब झाली, दुसऱ्या षटकात कर्णधार चामारी अटापट्टू स्वस्तात परतली. तिने फक्त २ धावा काढल्या. तथापि, त्यानंतर, हसिनी परेरा आणि दुल्हनीने उल्लेखनीय भागीदारी केली. दोघींनी धावसंख्या ८६ पर्यंत नेली आणि १२व्या षटकात दुल्हानीची विकेट पडली तेव्हा भारताला दुसरा विजय मिळाला. पण एका टोकाला परेराने आपले स्थान टिकवून ठेवले. १७ व्या षटकात ती बाद झाली. तिने ६५ धावा केल्या. तथापि, दुसऱ्या टोकाला विकेट पडत राहिल्या. परेराची विकेट पडली तेव्हा श्रीलंकेला विजयासाठी २० चेंडूत ४४ धावा हव्या होत्या. शेवटच्या दोन षटकात श्रीलंकेला ३४ धावा हव्या होत्या. तथापि, श्रीलंकेला फक्त १६० धावा करता आल्या आणि भारताने १५ धावांनी सामना जिंकून मालिका ५-० अशी जिंकली.

स्मृती मानधनाच्या जागी जी. कमलिनीला पदार्पणाची संधी मिळाली. तथापि, भारताची सुरुवात चांगली झाली नाही. दुसऱ्या षटकात शेफाली वर्मा केवळ ५ धावा काढून बाद झाली. त्यानंतर पदार्पण करणारी कमलिनीने डाव स्थिर करण्याचा प्रयत्न केला, परंतु पाचव्या षटकात १२ धावांवर तिची विकेट गमावली. त्यानंतर भारताच्या विकेट पडत राहिल्या. तथापि, हरमनप्रीतने उल्लेखनीय खेळी केली.

## क्रिकेट ऑस्ट्रेलियाची 'टेस्ट टीम ऑफ द इयर' जाहीर

### तेंबा बावूमा कर्णधार, चार भारतीयांना स्थान

**सिडनी : वृत्तसंस्था**

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची प्लेईंग ११ निवडली आहे. या संघाच्या कर्णधारपदी दक्षिण आफ्रिकेला चॅम्पियन बनवणाऱ्या तेंबा बावूमाची निवड केली आहे.



बावूमाच्या नेतृत्वाखाली खेळताना दक्षिण आफ्रिकेने पहिल्यांदाच आयसीसी ट्रॉफी उंचावली आहे. यासह काही दिवसांपूर्वीच झालेल्या भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेत भारतीय संघावर २-०ने एकतर्फी विजयाची नोंद केली होती. या प्लेईंग ११मध्ये भारतीय संघातील चार खेळाडूंना स्थान दिले आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने निवडलेल्या प्लेईंग ११मध्ये सलामीवीर फलंदाज म्हणून ऑस्ट्रेलियाचा स्फोटक फलंदाज ट्रॅव्हिस हेड आणि भारताचा विश्वास फलंदाज केएल राहुलची निवड केली आहे.

ट्रॅव्हिस हेडने ऑस्टेलियासाठी सलामी करताना दमदार शतके झळकावली आहेत, तर दुसरीकडे केएल राहुलनेदेखील ८१३ धावा केल्या आहे. या दोघांसह मधल्या फळीत फलंदाजी करण्यासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने जो रूट, शुबमन गिल आणि तेंबा बावूमाची निवड केली आहे. रूटने या वर्षी कसोटी क्रिकेट खेळताना ५०.३१ च्या सरासरीने धावा केल्या आहेत, तर शुबमन गिलनेदेखील लागोपाठ शतके झळकावून ९८३ धावा केल्या आहेत.

या संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी तेंबा बावूमाकडे सोपवण्यात आली आहे. यष्टिरक्षक फलंदाज म्हणून लेक्स कॅरीला संघात स्थान देण्यात आले आहे. यासह बेन स्टोक्सचा अष्टपैलू खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला आहे. गोलंदाज म्हणून मिचेल स्टार्कला प्लेईंग ११मध्ये स्थान देण्यात आले आहे, तर जसप्रीत बुमराह, स्कॉट बोलँड यांनादेखील संघात स्थान देण्यात आले आहे. फिरकी गोलंदाज म्हणून सायमन हार्मरचा संघात समावेश करण्यात आला आहे. याशिवाय १२वा खेळाडू म्हणून रवींद्र जडेजाचा समावेश करण्यात आला आहे.



**पनवेल : शिवाजीनगर येथील रामशेठ ठाकूर मैदानामध्ये एमजी ग्रुप प्रिमीयर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहित केले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, रविशेठ पाटील, कामगार नेते महेंद्र घरत यांच्यासह पदाधिकारी, एम.जे.ग्रुपचे सदस्य आणि खेळाडू उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खेळ म्हणून नाही तर जिंकण्यासाठी खेळण्याची जीद्द घेऊन मैदानात उतरा असा, सल्ला खेळाडूंना दिला.**

## मेलबर्नच्या खेळपट्टीवर आयसीसीचे ताशेरे

**मेलबर्न** : ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील चौथ्या अॅशेस कसोटीसाठी वापरण्यात आलेली मेलबर्न क्रिकेट ग्राऊंड (एमसीजी) येथील खेळपट्टी 'असमाधानकारक' असल्याचे जाहीर करत आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) स्टेडियमला एक डिमेरिट पॉईंट दिला आहे. पंच जेफ क्रो यांच्या अहवालानुसार खेळपट्टी गोलंदाजांच्या बाजूने झुकलेली होती.

आयसीसीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खेळपट्टी आणि मैदानाचे निरीक्षण प्रक्रियेंतर्गत मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडची खेळपट्टी असमाधानकारक ठरवण्यात आली असून स्टेडियमला एक डिमेरिट पॉईंट देण्यात आला आहे.

## वर्ल्डकप विजेता खेळाडू व्हेंटिलेटरवर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


ऑस्ट्रेलियाच्या २००३ मधील वर्ल्डकप विजेता खेळाडू सध्या मृत्यूशी झुंज देत आहे. ऑस्ट्रेलियामधून येणाऱ्या रिपोर्ट्समध्ये यासंबंधित माहिती समोर आली आहे. ५४ वर्षीय खेळाडूची प्रकृती बिघडल्याने बॉक्सिंग डे दिवशी ब्रिस्बेनमधील रूग्णालयात दाखल केलं. मंगळवारी संध्याकाळी त्यांच्या प्रकृतीची बातमी समोर आली.

द गार्डियनच्या वृत्तानुसार, डेमियन मार्टिन हे सुमारे एक आठवड्यापासून आजारी होते. वृत्तानुसार, डेमियन मार्टिन सध्या रुग्णालयात आपल्या आयुष्याशी झुंज देत आहे. डेमियन मार्टिनचा जन्म डार्विनमध्ये झाला. त्यांनी वयाच्या २१ व्या वर्षी ऑस्ट्रेलियासाठी कसोटी पदार्पण केलं. १९९२-९३ मध्ये मार्टिनने डीन जोन्सची जागा घेतली. त्यानंतर ते वयाच्या २३ व्या वर्षी वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचा कर्णधार बनले. २००४ मध्ये ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध (भारतात) बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी जिंकली., या मालिकेतील मालिकावीर पुरस्कार मिळवला.

## श्रीलंकेच्या क्रिकेटपटूचा ३४व्या वर्षी मृत्यू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्षाच्या अखेरीस क्रीडा जगतावर शोकाकळा पसरवणारी बातमी समोर आली. श्रीलंकेचा माजी अंडर-१९ क्रिकेटपटू अक्षु फर्नांडो याचं निधन झालं आहे. अक्षु फर्नांडोने ३० डिसेंबरला अखेरचा श्वास घेतला. गेल्या अनेक वर्षांपासून तो कोमात होता आणि लाईफ सपोर्टवर होता. त्याच्या निधनाच्या बातमीने क्रिकेट जगतात शोककळा पसरली आहे.



२८ डिसेंबर २०१८ ला दक्षिण कोलंबोतील माउंट लव्हिनिया येथे झालेल्या एका दुःखद अपघातात अक्षू फर्नांडो गंभीर जखमी झाला. समुद्रकिनाऱ्यावर सराव केल्यानंतर, तो एका असुरक्षित रेल्वे ट्रॅक ओलांडत असताना त्याला ट्रेनने धडक दिली. या गंभीर अपघातात त्याला जबर दुखापत झाली, त्यानंतर तो बराच काळ कोमात लाईफ सपोर्ट सिस्टमवर होता.

उजव्या हाताचा प्रतिभावान फलंदाज अक्षु फर्नांडोची देशांतर्गत क्रिकेटमधील कारकिर्द वेगाने प्रगती करत असताना वयाच्या २७ व्या वर्षी हा अपघात झाला. नऊ वर्षांच्या देशांतर्गत क्रिकेट कारकिर्दीत, अक्षु फर्नांडोने कोल्ट्स क्रिकेट क्लब, पनादुरा स्पोर्ट्स क्लब, चिलाव मेरियन्स स्पोर्ट्स क्लबसह अनेक संघांचे प्रतिनिधित्व केलं आणि आपल्या प्रतिभेने निवडकर्त्यांचं लक्ष वेधून घेतलं.

# सर्फराझ खानची दीडशतकी खेळी

## मुंबईची धावसंख्या ४०० पार

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्फराझ खानने वादळी खेळीसह वर्षाचा शेवट अगदी गोड केला आहे. २०२५ च्या अखेरच्या दिवशी विजय हजारे ट्रॉफीमध्ये सर्फराझ खानने एक दमदार शतक झळकावलं. मुंबई आणि गोवा यांच्यातील सामना जयपूरमध्ये खेळला जात होता, या सामन्यात सर्फराझ खानने ५९ चेंडूत शतक करत सर्वांचं लक्ष वेधलं. या खेळीदरम्यान त्याने अर्जुन तेंडुलकरची चांगलीच धुलाई केली. दीडशतकी खेळीसह मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ४४४ धावा केल्या आहेत.



गोवा विरुद्ध सामन्यात सर्फराझ खान व त्याचा भाऊ मुशीर खान यांनी ९३ धावांची भागीदारी केली. मुशीर खान ६० धावा करत माघारी परतला. यानंतर सर्फराझ खानने डावाची जबाबदारी घेत ७५ चेंडूत १५७ धावा केल्या. २०९ पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने धुव्वाधार फटकेबाजी करताना त्याने १४ षटकार आणि ९ चौकारांसह ही खेळी साकारली. त्याने फक्त ५७ चेंडूत शतक पूर्ण केलं. सर्फराझ खानने शतक पूर्ण करण्यासाठी आठ षटकार मारले.

विजय हजारे ट्रॉफीच्या चालू हंगामातील सर्फराझ खानचं हे पहिलं शतक आहे. या हंगामात त्याची मागील सर्वोत्तम धावसंख्या ५५ होती, जी त्याने उत्तराखंडविरुद्ध सामन्यात केली होती. लिस्ट ए क्रिकेटमधील सर्फराझ खानचं हे तिसरं शतक आहे. सर्फराझ खानने गोव्याच्या सर्वच गोलंदाजांविरूद्ध हल्लाबोल केला. पण यादरम्यान त्याने अर्जुन तेंडुलकरच्या गोलंदाजीविरूद्धही शानदार फटकेबाजी केली.

अर्जुन तेंडुलकरने ८ षटकांत ७८ धावा दिल्या आणि त्याला एकही विकेट मिळाली नाही. मुंबई संघाने ५० षटकांत ८ बाद ४४४ धावांची विक्रमी धावसंख्या उभारली. यशस्वी जैस्वालने ४६ धावा करत संघाला चांगली सुरूवात करून देण्याचा प्रयत्न केला. यानंतर मुशीर खाने ६० धावांची व सर्फराझ खानने १७५ धावांची खेळी केली. याशिवाय कर्णधार शार्दुल ठाकूरने २७ धावांचं योगदान दिलं. तर यष्टीरक्षक हार्दिक तामोरे याने २८ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह ५३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तर शम्स मुलाणीने २२ धावा तर तनुष कोटियन यांनी २३ धावांची खेळी केली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com